**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०१ / २०१२.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १८ / ०५ /२०१२.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०१ , शनिवार दिनांक २६ / ०५ /२०१२.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक २६ / ०५ / २०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** माळीवाडा येथील जुने महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी
३. मागील सभा क्रमांक ८ दि.१६/०२/२०१२, सभा क्रमांक ९ दि.१७/०२/२०१२ व सभा क्रमांक १० दिनांक १९/०३/२०१२ रोजीचे इतिवृत्त.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०१ शनिवार दिनांक २६/०५/२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १ | मागील सभा क्रमांक ८ दि.१६/०२/२०१२, सभा क्रमांक ९ दि.१७/०२/२०१२ व सभा क्रमांक १० दिनांक १९/०३/२०१२ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करणे. |
| २ | दुखवट्याचा प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेतर्फे **"भगवान महावीर जयंती"** उत्सव साजरा करणे बाबत मा.श्री.संजय चोपडा नगरसेवक यांची दिनांक २६/०८/२०११ रोजीचे यादीवर ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वाडियापार्क क्रीडा व व्यापारी संकुलास **छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल** असे नामकरण करणे बाबत मा.श्री.बाळासाहेब बोराटे,नगरसेवक व मा.सौ.गितांजली काळे, उपमहापौर यांचे यादीवर ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर शहरातील अर्बन बँक चौकाचे **" कै.नवनीतभाई बार्शिकर "** असे नामकरणे करणेबाबत मा.श्री.संजय चोपडा, नगरसेवक यांचे यादीवर ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | अहमदनगर शहरातील बंगाल चौकी या चौकाला संत **" श्री जलाराम बाप्पा चौक "** असे नामकरण करणे बाबत मा.श्री.दत्तात्रय कावरे,नगरसेवक यांचे यादीवर ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५४ मधील नालेगांव सर्व्हे नंबर ४६/१ आरक्षण क्रमांक १८८ या मोकळया जागेला **" विरंगुळा मैदान "** असे नाव देणे बाबत ज्येष्ठ नागरीक संघ, स्टेशन परिसर अहमदनगर यांचे पत्रावर ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील टी.पी.स्कीम नं.४ स.नं.२६३ मधील कृपाल आश्रम समोरील रस्त्याचे (मार्गाचे) **" संत कृपाल सिंहजी मार्ग "** या नावाने नामकरण होणे बाबत सौ.सुमनताई मो.गंधे,नगरसेविका यांची यादी व मा.श्री.शामलाल छाबरिया,अध्यक्ष, कृपाल आश्रम यांचे पत्रावर ऑफिस रिपोर्ट. |
| ९ | अहमदनगर महानगरपालिकेतील कायम कर्मचा-यांचे रूपये १,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल ) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि.१९४९ नुसार महापालिका प्रशासकीय प्रमुख म्हणून आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेची राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगांव येथील महिला जिम खाजगी तत्वावर भाडे तत्वावर चालविण्यास देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| ११ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १८ / ०५ /२०१२.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १** **दिनांक : २६/०५/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** मागील सभा क्रमांक ८ दि.१६/०२/२०१२, सभा क्रमांक ९ दि.१७/०२/२०१२ व सभा क्रमांक १० दिनांक १९/०३/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** मागील सभा क्रमांक ८ दि.१६/०२/२०१२, सभा क्रमांक ९ दि.१७/०२/२०१२ व सभा क्रमांक १० दिनांक १९/०३/२०१२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

**चर्चा :-**

**मा.श्री.निखील वारे :-** मागील सभेचे इतिवृत्त मंजूरीसाठी आजच्या सभेसमोर ठेवण्यांत आले या इतिवृत्तामध्ये एक विषय अनधिकृतपणे घेण्यात आला आहे. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारा हा रेखांकन मंजूरीचा विषय असून यापूर्वीच्या सभेत या विषयावर कोणत्याही प्रकारे चर्चा झालेली नाही. कॉग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे वतीने विनंती की हा विषय मंजूर करु नये.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** या विषयास कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस तर्फे विरोध नोंदविण्यात यावा इतिवृत्तामध्ये विरोधाची नोंद घेण्यात यावी.

**मा.श्री.हाजी नजीर शेख :-** नगरच्या विकासासाठी हा विषय घेण्यात आला होता लेआउट अंतिम मंजूरीच्या वेळी संबंधीत प्लॉट धारकांना याचे पैसे भरावे लागणार आहेत. त्यामुळे डांबरीकरण हा विषय रद्द करण्यांत यावा अंतीम मंजूरीसाठी ले आउट कोणी टाकणार नाही.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** सभागृहात एकएकाने आपले मत मांडावे सर्वांनी उठून चर्चा करु नये.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** मा.श्री.हाजी नजीर शेख यांनी जी सूचना मांडली ती बरोबर आहे अंतीम मंजूरीसाठी ले आउट कोणी टाकणार नाही.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** हा विषय पालिकेचे विश्वस्त म्हणून मांडला की बिल्डर म्हणून मांडला आजही उपनगरामध्ये ब-याच ठिकाणी डांबरी रस्ते नाहीत. स्ट्रीट लाईट नाही, मुलभूत सुविधापासून हा भाग वंचीत आहे. रेखांकनाचे विषयामुळे महापालिकेवर बोजा पडणार आहे. त्यासाठी पैसा कोठून उपलब्ध करणार याचा खुलासा करावा.

**मा.श्री.निखिल वारे :-** एवढा महत्वाचा विषय व महापालिकेची सर्व साधारण सभा असतांना मा.आयुक्त सभागृहात उपस्थित नाहीत त्यांचे गैरहजेरी बाबत खुलासा करणेत यावा.

बालिकाश्रम रस्ता रुंदीकरणा संदर्भात नागरिकांचा सभेच्या ठिकाणी मोर्चा आला. सहाय्यक आयुक्त यांनी मोर्चेकरांचे निवेदन स्विकारले.

**मा.उपायुक्त :-** मा.प्रधानसचिव यांची परवानगी घेवून मा.आयुक्त गेलेले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार त्यांनी त्यांचे वतीने सभेचे कामकाज पाहणेसाठी अधिकार प्रदान केले नुसार मी सभागृहात कामकाज पहात आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** मा.आयुक्तांची आजच्या सभेस अनुपस्थिती ही त्यांचाही यात सहभाग असल्याचे दिसुन येते.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** रेखांकना संदर्भात पुर्वीचा प्रस्ताव वाचून दाखविला तो मजकुर समावेश करणे. तसेच दिलेल्या पत्राप्रमाणे इतिवृत्तात दुरूस्ती करावी.

यासर्व बाबींचा विचार करता प्रस्ताव ५८ नुसार मा.राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा तोपर्यंत कुठलाही निर्णय यावर घेवू नये.

प्रशासनाकडे मी दोन पत्र या संदर्भात दिली होती व माहिती मागीतली असता मला थातुरमातूर उत्तरे देण्यांत आली आपण १० हजार स्क्वेअर फुटला किती एफएसआय देतो याची माहिती द्या.

**नगररचनाकार :-** आपण १ एफएसआय देतो.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** आपण जर ठराव केला १० एफएसआय द्या तर अंमलबजावणी करणार का ?

**नगररचनाकार :-** कायदेशीर नसल्याने अंमलबजावणी करणार नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** मग यापूर्वी चूकीचा झालेला ठराव आपण शासनाकडे का पाठविला नाही. सभागृहासमोर चूकीची माहिती द्यायची व दिशाभुल करण्याचे काम सध्या चालू आहे. अधिका-यांनी अभ्यासपूर्वक उत्तरे देणे अपेक्षित आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** इतिवृत्तात घेण्यात आलेल्या रेखाकनाचे विषयास प्रशासनातर्फे टिपणी ठेवण्यात आली होती का ?

**नगररचनाकार :-** टिपण्णी ठेवण्यांत आली नव्हती.

**मा.श्री.निखिल वारे :-** खडीकरणा ऐवजी डांबरीकरण करण्याचे कामाचा समावेश करण्याचा अधिकार कोणाला आहे ते सांगा.

**नगररचनाकार :-** सदरचा विषय हा कायदेशीर बाबीचा आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** नगरकरांच्या हिताचा हा विषय आहे का आयुक्तांच्या विशेषाधिकारात हा विषय घेता आला असता.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** या विषया बाबत कायदा काय सांगतो ते सांगा तसेच इतर कोणत्या नगरपालिकेत अशा प्रकारे कार्यवाही सुरु असल्यास त्याबाबत मा.महासभेस माहिती देण्यांत यावी.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** मा.महापौर साहेब पुढचा विषय घेण्यांत यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मागील वेळेस किती ले-आउट मंजूरीसाठी आले व आता किती आले ते सांगा.

भाजपा शिवसेना नगरसेवकांचे मा.महापौर यांना निवेदन.

**मा.महापौर :-** मागील सभा क्रमांक ८ दि.१६/०२/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे. मा.महासभा ठराव क्र. ३४ दि. १७-२-२०१२ अन्वये अंदाजपत्रक सन २०१२-२०१३ बाबत घेण्यात आलेल्या महासभेच्या इतिवृत्ताचा विषय आज रोजीच्या महासभेत कायम करण्यासाठी होता. त्यामधील सन २०११-२०१२ मधील प्रस्ताव क्रमांक ८ मध्ये फेरबदल सुचविलेला होता. याबाबत आज रोजीच्या सभेमध्ये सदर ठरावाबाबतच्या इतिवृत्ताबाबत सभागृहात झालेली चर्चा व मा.नगरसेवक सौ.गिरीजाबाई भाउत्साहेब उडानशिवे व इतर ३८ नगरसेवक यांच्या स्वाक्षरीचे सभागृहात प्राप्त झालेले निवेदन पाहता अंदाजपत्रक सन २०११-२०१२ मधील प्रस्ताव क्र.८ अन्वये रेखांकन सुधारणा मधील डांबरीकरण प्रस्ताव रद्द करणेबाबत मा.महासभेने मा.नगरसेवक यांचे प्रस्तावानुसार मान्यता दिलेली होती. त्या ऐवजी सदर प्रस्तावा बाबत **मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी नियमानुसार व उचीत कार्यवाही करावी.** अशा प्रकारे दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

मा.नगरसेवक श्री.दिलीप सातपुते यांनी सभागृहात दिलेल्या पत्रानुसार सन २०११-२०१२ मधील अंदाजपत्रकातील प्रस्ताव क्र. ८ मधील डांबरीकरणाच्या कार्यवाही बाबत मा.शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात यावे. मार्गदर्शन प्राप्त होई पावेतो सदर ठरावातील डांबरीकरण कार्यवाही बाबत अंमलबजावणी करू नये या मागणीस देखील मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. तसेच सभा क्रमांक १० दिनांक १९/०३/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

मागील सभा क्रमांक ८ दि.१६/०२/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यांस मान्यता देत आहे. सभा क्रमांक ९ मा.महासभा ठराव क्र. ३४ दि. १७-२-२०१२ अन्वये अंदाजपत्रक सन २०१२-२०१३ बाबत घेण्यात आलेल्या महासभेच्या इतिवृत्ताचा विषय आज रोजीच्या महासभेत कायम करण्यासाठी होता. त्यामधील सन २०११-२०१२ मधील प्रस्ताव क्रमांक ८ मध्ये फेरबदल सुचविलेला होता. याबाबत आज रोजीच्या सभेमध्ये सदर ठरावाबाबतच्या इतिवृत्ताबाबत सभागृहात झालेली चर्चा व मा.नगरसेवक सौ.गिरीजाबाई भाउत्साहेब उडानशिवे व ३८ इतर नगरसेवक यांच्या स्वाक्षरीचे सभागृहात प्राप्त झालेले निवेदन पाहता अंदाजपत्रक सन २०११-२०१२ मधील प्रस्ताव क्र.८ अन्वये रेखांकन सुधारणा मधील डांबरीकरण प्रस्ताव रद्द करणेबाबत मा.महासभेने मा.नगरसेवक यांचे प्रस्तावानुसार मान्यता दिलेली होती. त्या ऐवजी सदर प्रस्तावा बाबत **मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी नियमानुसार व उचीत कार्यवाही करावी.** अशा प्रकारे बहुमताने दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

मा.नगरसेवक श्री.दिलीप सातपुते यांनी सभागृहात दिलेल्या पत्रानुसार सन २०११-२०१२ मधील अंदाजपत्रकातील प्रस्ताव क्र. ८ मधील डांबरीकरणाच्या कार्यवाही बाबत मा.शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात यावे. मार्गदर्शन प्राप्त होई पावेतो सदर ठरावातील डांबरीकरण कार्यवाही बाबत अंमलबजावणी करू नये या मागणीस देखील मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार उचित कार्यवाही करावी.

सभा क्रमांक १० दिनांक १९/०३/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाऊ सातपुते

अनुमोदक : मा.सौ.संगिता रत्नाकर खरमाळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २** **दिनांक : २६ /०५ /२०१२**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - --

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार माजी मंत्री लोकनेत्या डॉ.विमलताई मुंदडा यांचे शुक्रवार दिनांक २३/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, क्रांतीवीर नागनाथ अण्णा जायकवडी यांचे शुक्रवार दिनांक २३/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष जनार्दन यादवराव गवळी यांचे सोमवार दिनांक २६/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | माजी आमदार शिवाजीराव काळे यांचे सोमवार दिनांक २६/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | ज्येष्ठ कवी माणिक सीताराम गोडघाटे उर्फ कवी ग्रेस यांचे मंगळवार दिनांक २७/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | संगमनेर सहकारी कारखान्याचे संस्थापक उपाध्यक्ष, सह्याद्री बहुजन विद्याप्रसारक संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड.भाऊ साहेब शंकरराव धुमाळ यांचे बुधवार दिनांक २८/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव बाबुराव कासार यांचे गुरुवार दिनांक २९/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | अहमदनगर येथील पत्रकार राजेश सटाणकर यांच्या मातोश्री गं.भा.सुशिलाबाई सदाशिव सटाणकर यांचे गुरुवार दिनांक २९/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ९ | जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या न्यु आर्टस महाविद्यालयात बाबा या टोपन नावाने परिचीत असलेले राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक जे.डी.गंगाधर दगडू जगताप यांचे गुरुवार दिनांक २९/०३/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १० | अहमदनगर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या लीलावती आरोळे यांचे सोमवार दिनांक ०९/०४/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ११ | ज्येष्ठ समाजवादी नेते व संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील अग्रणी व राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते राम दसरे यांचे बुधवार दिनांक ११/०४/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| १२ | नगर शहरातील मनसे नगरसेवक मा.श्री.किशोर डागवाले यांच्या मातोश्री श्रीमती.सत्यभामा आसाराम डागवाले यांचे शनिवार दिनांक ०५/०५/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

| | |
|---|---|
| १३ | नगर शहरातील कांतीलाल पन्नालाल उर्फ बाबूशेठ बोरा यांच्या पत्नी विमलताई बोरा यांचे शनिवार दिनांक ०५/०५/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १४ | नगर शहरातील एमआयडीसी मधील त्रिमुर्ती फौन्ड्री या उद्योगाचे उद्योजक श्री.कांतीलाल मुथा यांचे मंगळवार दिनांक ०८/०५/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १५ | नगर शहरातील भारतीय जैन संघटनेचे कार्यकर्ते व अध्यापक मोतीलाल भिकचंद ओस्तवाल यांचे मंगळवार दिनांक ०८/०५/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १६ | नगर शहरातील एमआयडीसी मधील एम एस इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचे मालक मधुसुदन बन्सीलाल धूत यांचे बुधवार दिनांक ०९/०५/२०१२ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३** **दिनांक : २६/५ /२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेतर्फे **"भगवान महावीर जयंती"** उत्सव साजरा करणे बाबत मा.श्री.संजय चोपडा नगरसेवक यांची दिनांक २६/०८/२०११ रोजीचे यादीवर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

सदंर्भ :- मा.श्री. संजय चोपडा, नगसेवक अहमदनगर महानगरपालिका यांचे दि.२६/८/२०११ रोजीचे पत्र

मा.श्री. संजय चोपडा नगरसेवक, अहमदनगर महानगरपालिका यांनी **"भगवान महावीर जयंती "** हा राष्ट्रीय उत्सव आहे. या उत्सवाला केंद्र शासन त्याचप्रमाणे राज्य शासनातर्फे सुट्टी दिली जाते. परंतु आपल्या महानगरपालिकेच्या डायरीमधील राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये त्याचा समावेश नाही. तरी त्याचा त्यामध्ये समावेश करण्यात यावा व येथून पुढे महानगरपालिकेतर्फे भगवान महावीर जयंती साजरी करण्यात यावी. या संबंधी सुचना संबंधीतांना त्वरीत देण्यांत याव्यात. याप्रमाणे संदर्भानी पत्रान्वये इकडेस कळविलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत राष्ट्रीय कार्यक्रम मनपाचे सभागृहात व राष्ट्रसंत व राष्ट्रीय व्यक्तीचे पुतळे बसविले आहेत त्या ठिकाणी राष्ट्रसंत राष्ट्र पुरूषांचे प्रतिमेस मा. महापौर, मा.आयुक्त, मा. उपमहापौर व मान्यवंराचे उपस्थितीत त्याचे हस्ते पुष्पहार अर्पण करून साजरे केले जातात भगवान महावीर जयंती निमित्त राज्य शासनातर्फे सार्वजनिक सुट्टी देण्यांत येते. त्याप्रमाणे दिनांक १६ एप्रिल २०११ रोजी भगवान महावीर जयंती निमित्त सार्वजनिक सुट्टी दिलेली होती. तथापी मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे सन २०११ मध्ये राष्ट्रीय पुरूषांची / थोर व्यक्तींची जयंती / पुण्यतिथी कार्यक्रम साजरे करणेबाबतचे परिपत्रक क्रमांक जपुती २२१०/प्र.क्र. १०९/२०१०/२९ दिनांक ३ जानेवारी २०११ चे शासकीय परिपत्रकामध्ये भगवान महावीर जयंती साजरी करणेबाबत सुचित केलेले नाही.

तरी राष्ट्रसंत व राष्ट्रीय व्यक्तींचे प्रतिमेस, पुतळयास पुष्पहार अर्पण करून साजरा करणेचे मनपाचे राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये "भगवान महावीर जयंती " या उत्सवाचा समावेश करून भगवान महावीर जयंती साजरी करणे किंवा कसे या विषयी पुढिल आदेश व्हावा हि विनंती.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची सही असे.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्र.नगरसचिव प्रस्तावीत "अ" प्रमाणेच्या परिपत्रकामध्ये नमुद नसलेल्या अन्य कार्यक्रम होत असल्यास त्याचा अहवाल द्या. तसेच त्यांचा समावेश कसा करण्यात आला याचाही अहवाल देणे.

नगरसचिव विभाग दि.२९/९/२०११

**फेरसादर,**

अहमदनगर महानगरपालिके मार्फत साजरे केले जाणारे राष्ट्रीय पुरूषांचे नेत्याचे पुण्यतिथी जयंती इ. राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये मा.शासन परिपत्रक क्रमांक जपुती २२१०/प्र.क्र.१०९/२०१०/२९ दिनांक ३जानेवारी २०११ चे परिपत्रकामधील कार्यक्रमा व्यतिरिक्त खालीलप्रमाणे कार्यक्रम साजरे केले जातात.

| अ.क्र. | **कार्यक्रमाचा तपशील** |
| --- | --- |
| १ | स्वामी विवेकानंद जयंती |
| २ | महात्मा गांधी पुण्यतिथी  हुतात्मा दिन |
| ३ | पंडित दिन दयाळ उपाध्याय स्मृमी दिन |
| ४ | सरदार वल्लभभाई पटेल पुण्यतिथी |
| ५ | वीर सावरकर पुण्यतिथी |
| ६ | छत्रपती शिवाजी महाराज  जयंती (तिथी प्रमाणे) |
| ७ | डॉ. हेडगेवार जयंती (गुढीपाडवा) |
| ८ | बुध्द पोर्णिमा (वैशाख पोर्णिमा) |
| ९ | स्वांत्र्यवीर सावरकर जयंती |
| १० | साने गुरूजी  पुण्यतिथी |
| ११ | डॉ. केशव बळीराम हेडगेवार पुण्यतिथी |
| १२ | शाहिर आण्णाभाऊ साठे स्मृतिदिन |
| १३ | लोकमान्य टिळक जयंती |
| १४ | कै. बाळासाहेब देशपांडे पुण्यतिथी |
| १५ | रावासाहेब पटवर्धन स्मृतिदिन |
| १६ | सेनापती बापट जयंती |
| १७ | संत गाडगे बाबा पुण्यतिथी<br>(आरोग्य विभागातर्फे आयोजित केले जाते.) |

तसेच संत निवृत्तीनाथ महाराज पालखी स्वागत, देवगड पालखी , मुक्ताबाई पालखी , दत्त जयंती पालखी  सोहळा , स्वागत इत्यादी कार्यक्रम साजरे केले जातात.

सदरचे कार्यक्रम साजरे करणे बाबत अहमदनगर महानगरपालिकेने कुठल्याही प्रकारचे उपविधी केलेले नाहीत. किंवा मा. शासनाचे त्याबाबत मार्गदर्शन नाही ते पुर्वी पासून आपले मनपा स्थरावर साजरे केले जातात  मा.शासनाचे परिपत्रकानुसार एखादा कार्यक्रम साजरा  करणे  बाबत सुचित केल्यास ते कार्यक्रम मनपा मार्फत साजरे करणे  बंधनकारक होते.

महानगरपालिकेमार्फत साजरे केले जाणारे कार्यक्रमामध्ये  समाज घटकाने संत राष्ट्र पुरूषांचे जयंती इत्यादी कार्यक्रम साजरे करणेबाबत मागणी केल्यास म.न.पा.चे राष्ट्रीय कार्यक्रमाची यादी मोठी होईल.

तरी राष्ट्रसंत व राष्ट्रीय व्यक्तींचे  प्रतिमेस, पुतळयास पुष्पहार अर्पण करून साजरा करणेचे मनपाचे राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये "भगवान महावीर जयंती" या उत्सवाचा समावेश करून भगवान महावीर जयंती साजरी करणे किंवा कसे या विषयी पुढिल आदेश व्हावा. हि विनंती.

यावर मा.सहाय्यक आयुक्त  यांचा अभिप्राय की, "अ" नुसार पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त यांची मा. महासभेपुढे ठेवा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट व फेरसादर प्रस्तावासह मा.आयुक्त साो, उपायुक्त (सा), सहाय्यक आयुक्त यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.संजय चोपडा :-** सदरचा विषय मंजूर करण्यांत यावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर साहेब :-** भगवान महावीर जयंती साजरी करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. मनपा जयंती पुण्यतिथी यादीमध्ये सदर जयंतीचा समावेश करण्यात यावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** बुरुडगांव भाजी मार्केटचे प्रिमीयम किती घेणार नगररचनाकार यांनी माहिती द्यावी.

**नगररचनाकार :-** मा.स्थायी समितीचा ठराव झालेला नाही त्यामुळे शासकीय रेडीरेकनेर प्रमाणे ३ कोटी ६७ लाख प्रिमीयमची रक्कम निश्‍चित करण्यात आली आहे. तेथील व्यायाम शाळेसाठी ५० लाख रु. रोख घेणार आहोत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आजच्या मितीला बुरुडगांव भाजी मार्केटच्या जागेचे भाव काय आहे या जागेची आजची बाजारभावाने किंमत २५ कोटी रुपये आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सदर कामाचे ओपन टेंडर काढण्यात आले होते. किंमत ठरविण्याचा अधिकार कोणाला आहे.

**नगररचनाकार :-** हा विषय ब-याच दिवसापासुन प्रलंबित आहे हा प्रस्ताव महानगरपालिकेने राबवायचा का एफबीटी तत्वावर विकसीत करायचा या कामासाठी तीन वेळा ई टेंडर काढण्यात आले परंतू निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** राष्ट्रीय पाठशाळेची जागा संस्थेने रक्कम रु.२०००/- स्क्वेअर फुटने विकली एक बिल्डर रु.३००० ने घ्यायला तयार झालेने याबाबत मे.कोर्टात वाद गेला व मे.कोर्टाने स्थगिती आदेश दिलेला आहे. महापालिकेचा जर मोठा फायदा होत असेल तर संबंधीत जर १० कोटीला घ्यायला तयार असेल तर संबंधिताला ते देण्यात यावे.

**नगररचनाकार :-** संबंधितांनी जर तशा प्रकारचे पत्र दिले तर महासभेच्या निदर्शनास आणुन सदर विषयावर निर्णय घेणे उचीत होईल.

**ठराव :-**

**"भगवान महावीर जयंती "** उत्सव साजरा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. मनपा जयंती पुण्यतिथी यादीमध्ये सदर जयंती उत्सवाचा समावेश करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.संजय फुलचंद चोपडा

अनुमोदक : मा.श्री.चंद्रशेखर उर्फ बाळासाहेब मारुती बोराटे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ४** **दिनांक : २६/५/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वाडियापार्क क्रीडा व व्यापारी संकुलास **"छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल"** असे नामकरण करणे बाबत मा.श्री.बाळासाहेब बोराटे , नगरसेवक व मा.सौ. गितांजली काळे, उपमहापौर यांचे यादीवर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : मा.उपमहापौर सौ.गितांजली सुनिल काळे व मा.श्री.बाळासाहेब बोराटे नगरसेवक यांचे दिनांक ०३/०१/२०१२ चे पत्र बांधकाम विभागास प्राप्त दि.०६/०२/२०१२.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जुना टिळक रोड ते जिल्हा परिषद मागील बाजू व मुकबधीर विद्यालय ते रुपीबाई फिरोदिया शाळा दरम्यानचा जागे मध्ये तत्कालीन नगरपालिका कालावधी मध्ये क्रीडांगण विकसीत करणे करीता मा.जिल्हाधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत बी.ओ.टी. पध्दतीत व्यापारी व क्रीडा संकुल उभारण्यात आलेले असून सदर संकुलाच्या भिंतीवर एम.आर.ट्रेड सेंटर असे नांव रंगविलेले आहे. परंतु सदर नांव संकुलावरीती कोणाच्या परवानगीने टाकलेले आहे. याबाबत प्रथमस्थिती कोणताही अहवाल नाही. व सदर जागेची मालकी मा.जिल्हाधिकारी यांची आहे.

परंतु मा.उपमहापौर सौ.गितांजली सुनिल काळे व मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे यांनी संदर्भीय पत्रान्वये संकुलास **" छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल "** असे नांव देण्याचे सुचविलेले आहे व सदरचा विषयाचे मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतु त्यापूर्वी सदर जागा मा.जिल्हाधिकारी यांचेकडे हस्तांतरणाची कार्यवाही नगररचना विभागा मार्फत झालेली असलेने सदर संकुलास नांव देणे बाबतचा नगररचना विभागाचा अभिप्राय आवश्यक आहे.

त्याकारणे मालकी हक्का बाबत व नांव देणे बाबतचा नगररचना विभागाचा अभिप्राय घेणेस्तव व तद्नंतर वाडियापार्क क्रीडा व व्यापारी संकुलास **" छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल "** असे नामकरण करणे बाबत निर्णयास्तव मा.महासभेकडे पाठविणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर प्र.शहर अभियंता श्री.मगर यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार उपरोक्त प्रकरणी कृपया आपला अभिप्राय मिळावा हि विनंती.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, वाडियापार्क क्रीडा संकुलास छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल असे नामकरण करणे बाबत...

विषयांकित वाडियापार्क क्रीडा संकुलाची जागा मा.जिल्हाधिकारी यांचेकडे हस्तांतरीत केलेली आहे. सबब सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे योग्य होईल.

जा.क्र.टि.पी.४१८९ दिनांक १५/०२/२०१२

यावर कनिष्ठ अभियंता यांचेकडुन सादर की, मा.नगररचनाकार, अहमदनगर महानगरपालिका यांचे अभिप्राया प्रमाणे विषयांकित वाडियापार्क क्रीडा संकुलाची जागा मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत केलेली आहे. त्या कारणे सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, वाडियापार्कची जागा मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा समिती यांचेकडे महानगरपालिकेने रितसर मा.महासभेची मंजुरी घेवुन हस्तांतरीत केलेनंतर क्रीडा संकुल व स्टेडीयमचे काम त्यांचेमार्फत करणेत आलेले आहे.

सबब वाडियापार्क क्रीडा व व्यापारी संकुलास " छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल " असे नामकरण करणेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीस पाठविणे करीता मंजुरीस सादर.

यावर प्र.शहर अभियंता श्री.मगर यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त श्री.संजय काकडे यांचा अभिप्राय की, "अ" मान्य.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सदर जागेची मा.जिल्हाधिका-यांकडे मागणी केली आहे असा उल्लेख टिपणीमध्ये केलेला आहे. त्याबाबत खुलासा करा.

**नगररचनाकार :-** मालकी महानगरपालिकेची दाखविलेली आहे. अंमलबजावणीसाठी मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडेस प्रस्ताव पाठवावा लागेल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** जागेचे मालक आपण असतांना जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्याचे कारण काय वास्तविक यापूर्वीचे नाव खोडणे आवश्यक होते. ताबडतोब त्याबाबत कार्यवाही करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मा.महापौर मॅडम पूर्वीचे नाव खोडण्याबाबत ताबडतोब आदेश द्या एम.आर.ट्रेड हे नाव देतांना मंजूरी घेतली होती का ?

**मा.महापौर सो :-** दहा दिवसात सदर प्रकरणी कार्यवाही करण्यांत येईल.

मा.महापौर यांची राज्य महापौर परिषदेवर निवड झाल्याबद्दल मा.नगरसेवकांचे वतीने सत्कार करण्यांत आला.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** मा.महापौर यांची राज्य महापौर परिषदेवर उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन मा.महापौर यांनी नगराध्यक्षा सारखे वित्तीय अधिकार महापौर यांना मिळणेचे दृष्टीने प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करावेत.

**ठराव :-**

सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार ठरविणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या वाडीया पार्क क्रीडा व व्यापारी संकुलास **"छत्रपती शिवाजी राजे क्रीडा व व्यापारी संकुल"** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बोराटे चंद्रशेखर उर्फ बाळासाहेब मारुती

अनुमोदक : मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ५** **दिनांक :२६/५/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर शहरातील अर्बन बँक चौकाचे **"कै.नवनीतभाई बार्शिकर चौक"** असे नामकरणे करणे बाबत मा.श्री. संजय चोपडा, नगरसेवक यांचे यादीवर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.नगरसेवक श्री.संजय चोपडा व मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे यांची दिनांक १४/१२/२०११ रोजीची यादी.

२) मा.नगरसेवक श्री.संजय चोपडा यांची दिनांक १३/०२/२०१२ रोजीची यादी.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर शहराचे शिल्पकार माजी आमदार माजी नगराध्यक्ष कै.नवनीतभाई बार्शिकर नगर शहराचे शिल्पकार म्हणुन व अहमदनगर शहरासाठी त्यांनी केलेले अनमोल कार्य शहरवासियांचे स्मरणात रहावे म्हणुन नगर शहराच्या विकासाचा पाया ज्यांनी रचना, दुरदृष्टी ठेवुन विविध योजनांची अंमलबजावणी केली असे कै.नवनीतभाई बार्शिकर ज्या अर्बन बँक चौकात रहात होते त्या चौकास **"कै.नवनीतभाई बार्शिकर चौक"** असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.संजय चोपडा यांनी संदर्भीय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

सदर चौकास सध्या " अर्बन बँक चौक " असे संबोधले जाते अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास चौकास अथवा इमारतीस नाव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने नगर शहरातील अर्बन बँक चौकास **" कै.नवनीतभाई बार्शिकर चौक "** असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणे करीता रिपोर्ट मंजूरीस सादर.

यावर प्र.शहर अभियंता श्री.मगर यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस तथा पुढील आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे सदर प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.संजय काकडे यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सा़ो, उपायुक्त (सा), शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.संजय चोपडा :-** विषय मंजूर करावा.
**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** विषय मंजूर करणेंत यावा.
**मा.महापौर सा़ो :-** अहमदनगर शहरातील अर्बन बॅक चौकाचे **" कै. नवनीतभाई बार्शिकर "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

--*--

**ठराव :-**

अहमदनगर शहरातील अर्बन बॅक चौकाचे **" कै. नवनीतभाई बार्शिकर "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. बोराटे चंद्रशेखर उर्फ बाळासाहेब मारुती

अनुमोदक : मा.श्री.चोपडा संजय फुलचंद

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ६** **दिनांक :२६/५/२०१२**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर शहरातील बंगाल चौकी या चौकाला संत **" श्री जलाराम बाप्पा चौक "** असे नामकरण करणे बाबत मा.श्री. दत्तात्रय कावरे, नगरसेवक यांचे यादीवर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.नगरसेवक श्री.कावरे दत्तात्रय हरीभाऊ यांची दिनांक १७/११/२०११ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर की, अहमदनगर शहरातील " बंगाल चौकी " या चौकास **"संत श्री जलाराम बाप्पा चौक "** असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.कावरे दत्तात्रय हरीभाऊ यांनी दिनांक १७/११/२०११ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

अहमदनगर शहरातील सदर चौकास सध्या " बंगाल चौकी " या नावाने संबोधले जाते या बाबत यापुर्वी तत्कालीन नगरपालिका अथवा महानगरपालिकेचा ठराव झालेला नाही.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास अथवा इमारतीस नांव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.महासभेकडे पाठविणेकरीता रिपोर्ट मंजुरीस सादर.

यावर प्र.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस तथा पुढील आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे सदरील प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.संजय काकडे यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** विषय मंजूर करावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर साहेब :-** अहमदनगर शहरातील बंगाल चौकी या चौकाचे **" संत जलाराम बाप्पा चौक "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

--*--

**ठराव :-**

अहमदनगर शहरातील बंगाल चौकी या चौकाचे **" संत जलाराम बाप्पा चौक "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दत्तात्रय हरीभाऊ कावरे

अनुमोदक : मा.श्री. चंद्रशेखर उर्फ बाळासाहेब मारुती बोराटे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-<br>महापौर,<br>अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ७** **दिनांक :२६/५/२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५४ मधील नालेगांव सर्व्हे नंबर ४६/१ आरक्षण क्रमांक १८८ या मोकळया जागेला **" विरंगुळा मैदान "** असे नाव देणे बाबत ज्येष्ठ नागरीक संघ, स्टेशन परिसर अहमदनगर यांचे पत्रावर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- ज्येष्ठ नागरीक संघ, स्टेशन परिसर, अहमदनगर यांचे दिनांक १२/०४/२०१२ चे निवेदन.

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५४ मधील नालेगांव सर्व्हे नंबर ४६/१ आरक्षण क्रमांक १८८ वरील मोकळया जागेला " विरंगुळा मैदान " असे नाव देणे बाबत सदर भागातील ज्येष्ठ नागरीक संघाने मा.महापौर यांचेकडेस केली आहे. सदर जागेस यापुर्वी नाव देणेबाबत तात्कालीन नगरपालिका अथवा महानगरपालिकेचा ठराव झालेला नाही.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस अथवा मैदानास नाव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा.नगररचनाकार, यांचा अभिप्राय घेवून मान्यतेसाठी मा.महासभेकडे पाठविणेकरीता रिपोर्ट मंजुरीस सादर.

यावर प्र.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये मा.नगररचना विभागाचे अभिप्रायास्तव सादर.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, विषयांकित जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. सबब परिसरातील नागरिकांच्या मागणी अर्जानुसार सदर जागेस " विरंगुळा मैदान " नाव देणेस या विभागाची हरकत नाही.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मैदानास नाव देण्याचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), शहर अभियंता, नगररचनाकार यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** विषय मंजूर करावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** विषय मंजूर करावा.

**मा.महापौर साहेब :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ५४ मधील नालेगांव सर्व्हे नंबर ४६/१ आरक्षण क्रमांक १८८ या मोकळया जागेला **"विरंगुळा मैदान "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

--*--

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ५४ मधील नालेगांव सर्व्हे नंबर ४६/१ आरक्षण क्रमांक १८८ या मोकळया जागेला **"विरंगुळा मैदान "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दत्तात्रय हरीभाऊ कावरे

अनुमोदक : मा.श्री. चंद्रशेखर उर्फ बाळासाहेब मारुती बोराटे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ८** **दिनांक :२६/५/२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील टी.पी.स्कीम नं.४ स.नं.२६३ मधील कृपाल आश्रम समोरील रस्त्याचे (मार्गाचे) **" संत कृपाल सिंहजी मार्ग "** या नावाने नामकरण होणे बाबत मा.सौ. सुमनताई मो. गंधे, नगरसेविका यांची यादी व मा.श्री. शामलाल छाबरिया, अध्यक्ष, कृपाल आश्रम यांचे पत्रावर ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.नगरसेविका सौ.सुमनताई मो.गंधे यांची यादी.

२) श्री.शामलाल छाबरीया, कृपाल आश्रम, अहमदनगर सेंटर यांचा दिनांक ०४/०५/२०१२ चा अर्ज

टी.पी.स्कीम नं.४ स.नं.२६३ मधील कृपाल आश्रम या नावाने संस्थेची भव्य वास्तु आहे. आश्रमामध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यासाठी ठिकठिकाणाहुन मोठया संख्येने भाविक प्रवचन, किर्तन तसेच ध्यान धारणेसाठी येतात. संत कृपाल सिंहजी महाराज यांच्या नावारुपाने सदर आश्रमाची स्थापना करण्यात आलेली आहे. संत कृपाल सिंहजी महाराज यांचे कार्य सर्व देशभर पसरलेले आहे. तरी त्यांच्या कार्याचा मान ठेवुन आश्रम समोरील रस्त्यास (मार्गास) " संत कृपाल सिंहजी मार्ग " असे नाव द्यावे अशी सर्व भाविकांची व परिसरातील सर्व नागरिकांची इच्छा आहे. वरील विषयास अनुसरुन सदर मार्गाचे नामकरण व्हावे अशी विनंती श्री.शामलाल छाबरीया, कृपाल आश्रम, अहमदनगर यांनी मा.महापौर यांचेकडे अर्ज देवुन केली आहे.

तरी टी.पी.स्कीम नं.४ स.नं.२६३ मधील कृपाल आश्रम समोरील रस्त्याचे (मार्गाचे) **" संत कृपाल सिंहजी मार्ग "** असे नामकरण करणे बाबतचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा योग्य तो अभिप्राय घेवून मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस रिपोर्ट सविनय सादर.

यावर प्र.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सादर.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, उपरोक्त विषयांकित रस्ता मंजूर विकास योजनेतील असुन विद्यमान आहे. त्यास कोणते नाव द्यावे याबाबतचा विषय या विभागाशी संबंधीत नाही असे असले तरी पूर्वी या रस्त्यास कोणतेही नाव दिले नसल्यास त्यास उपरोक्त नाव देण्यास या विभागाची हरकत नाही.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.संजय काकडे यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे पाठवा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त साो, उपायुक्त (सा), शहर अभियंता, नगररचनाकार व इनचार्ज अभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :-

**मा.श्रीमती.संगिता खरमाळे :-** संत कृपाल सिंहजी मार्ग नांव कोणत्या रस्त्यास देणार आहेत.

श्री.सातपुते प्र.शहरअभियंता :- टी.पी.स्कीम नं.४ सर्व्हे नंबर २६३ मधील कृपाल आश्रमच्या समोरील रस्त्यास नांव देणार आहोत.

मा.महापौर साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील टी.पी.स्कीम नं.४ स.नं.२६३मधील कृपाल आश्रम समोरील रस्त्याचे (मार्गाचे ) **"संत कृपाल सिंहजी मार्ग "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील टी.पी.स्कीम नं.४ स.नं.२६३मधील कृपाल आश्रम समोरील रस्त्याचे (मार्गाचे ) **"संत कृपाल सिंहजी मार्ग "** असे नामकरण करण्यात यावे. नामकरण फलकाचा खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.सुमनताई मोहनीराज गंधे

अनुमोदक : मा.सौ.संगिता रत्नाकर खरमाळे

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ९** **दिनांक :२६/५/२०१२**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेतील कायम कर्मचा-यांचे रूपये १,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल ) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून मंजूरी देणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि.१९४९ नुसार महापालिका प्रशासकीय प्रमुख म्हणून आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मा.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१ आरोग्य ३, मंत्रालय मुंबई. दि.१९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतरुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती मंजूर करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करणेस मा.महासभा ठराव क्रमांक २ दि.३/११/०७ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार जा.क्र.३५१ दि.२९/४/०८ अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना दिनांक १/४/०८ पासुन लागु करण्यांत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१ / आरोग्य ३ मंत्रालय,मुंबई ३२ दिनांक १९ मार्च २००५ च्या आदेशान्वये मुद्दा क्र.३ मधील २ नुसार प्रचलित पध्दतीनुसार रु.२०,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस एक विशेष बाब म्हणुन मंजुरी देणे बाबतची प्रकरणे सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागास सादर केली जात होती. आता रु.४०,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१, व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेणेचे पुर्ण अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देणेत आलेले असल्याने श्रीमती.कुचेकर शांता अर्जुन, सफाई कामगार यांचे वैद्यकीय प्रतिपुर्तीची रक्कम रु.४०,०००/- च्यापुढे असल्याने आस्थापना जा.क्र.२४ दि.२-४-२००९ अन्वये मा.कक्ष अधिकारी नवि २८ नगरविकास मंत्रालय मुंबई यांचेकडे मंजुरीस्तव पाठविण्यांत आले होते.

तथापि मा.कक्ष अधिकारी यांनी त्यांचेकडील क्र.अमपा २००९/७९१/प्र.क्र.४७ नवि-२४ दि.नगरविकास विभाग मुंबई दि.२७ जुलै २००९ अन्वये सदरच्या बिलांच्या प्रतिपुर्ती विषयी निर्णय घेण्यास आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका हे सक्षम आहेत. व त्यांनी त्यांचे स्तराव निर्णय घेणे असे कळविलेले आहे.

तथापी मा.कक्ष अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अमपा २००९/७९१/प्र.क्र.४७ नवि-२४ नगरविकास विभाग मुंबई दिनांक २७ जुलै २००९ पाहता सदर वैद्यकी प्रतिपुर्ती प्रकरणा बाबत मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेणे संयुक्तीक होईल तरी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अ, नुसार मुलेप यांचा अभिप्राय घेवुन सादर करा.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, वरील "अ" प्रमाणे रु.४०,०००/- वरील वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबत आयुक्त हे सक्षम आहेत असे कळविले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही. परंतु मनपा आयुक्त यांना हे अधिकार शासनाचे कोणते आदेशान्वये सुपूर्त केले आहे. याबाबत शासनाकडून माहिती मागविणे उचीत होईल. आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, नगरविकास मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.अमपा-२००९/७९१/प्र.क्र.४७/नवि-२४ दि.२७ जुलै २००९ नुसार आयुक्त हे निर्णय घेण्यास सक्षम असल्याचे कळविले आहे. त्यानुसार वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ" व "ब" पाहता संभ्रम निर्माण होतो. शासनाचे आदेशासह फेर सादर करावे.

यावर फेरसादर रिपोर्ट की, मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक एमएजी/२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३ मंत्रालय मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये फक्त रु.४०,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजुरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत.

मा.कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे दि.२७ जुलै २००९ चे पत्रानुसार सदर प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका हे निर्णय घेण्यास सक्षम आहेत असे कळविलेले आहे. परंतु रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देयके मंजूर करण्याचे कोणतेही आदेश प्राप्त नाही.

तरी मुख्यलेखापरिक्षक यांचे अहवालानुसार रु.४०,०००/- चे वरील प्रतिपूर्ती खर्चाची रक्कम मंजूर करण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत. या बाबतचा शासन निर्णय मा.शासनाकडुन मागवून तद्नंतर सदरचे वैद्यकीय परतावा देयके मंजूर करणे उचीत होईल. आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ" प्रस्तावित नुसार शासन निर्णय मागवून घेवुन फेर सादर करावे.

यावर फेरसादर रिपोर्ट की,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके मा.कक्ष अधिकारी नगरविकास मुंबई यांचेकडे मंजूरीकरीता सादर करण्यात आली होती. परंतु मा.कक्ष अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २७ जुलै २००९ चे पत्रानुसार या प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका हे निर्णय घेण्यास सक्षम आहेत. त्यांचे स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात यावा असे कळविलेले आहे.

मा.शासनाचे दि.१९ मार्च २००५ चे शासन निर्णयानुसार फक्त रु.४०,०००/- पर्यंतचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देयके मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत. रुपये ४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देयके मंजूर करणे बाबतचे कोणतेही आदेश मा.आयुक्त यांना देण्यांत आलयाचे दिसून येत नाही.

मा.उपआयुक्त साहेब यांचे आदेशानुसार रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देयके अदा करणे बाबत मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान केल्याबाबतच्या आदेशाच्या प्रतीची मागणी आस्थापना जा.क्र.२४०५ दि.२९/१०/०९ अन्वये मा.कक्ष अधिकारी यांचेकडे करण्यांत आलेली आहे. परंतु सदर बाबत अद्यापपर्यंत कोणतेही आदेश इकडेस प्राप्त झालेले नाहीत.

प्रस्तावीत कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती देयक मंजूर करणे झाल्यास सदर देयक मा.मुख्य लेखापरीक्षक यांचेकडुन तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.

तरी रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्च प्रतीपूर्ती देयक अदा करणे बाबत मा.शासनाकडुन अद्यापपर्यंत आदेशाची प्रत प्राप्त झाली नसल्यामुळे सदर देयक अदा करणे बाबत आपले स्तरावर निर्णय घेणेबाबत रिपोर्ट मंजूरीस्तव आदेशार्थ.

यावर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मा.शासनाकडून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती बाबतच्या आदेशाबाबत माहिती मागविण्यांत यावी.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती बिला पोटी रु.४० हजार पर्यंत मा.आयुक्त मनपा व रु.४० हजारचे पुढे संबंधित विभागाचे विभाग प्रमुखांना मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यांत येत आहेत असे महाराष्ट्र शासन सा.आ.वि. शासन निर्णय क्र.एम.जी.२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३ मंत्रालय मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये कळविले आहे. मात्र दि. २७ जुलै २००९ रोजीच्या नगरविकास विभागाचे पत्रान्वये आयुक्त मनपा सक्षम आहेत असे कळविले आहे.

उपरोक्त विरोधाभास वाटतो करीता समक्ष चर्चा करुन निर्णय घेणे उचित राहील असे मत आहे.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, शासनास २९/१०/२००९ नुसार पाठविलेल्या पत्राचा संदर्भ देवून कोणत्या शासन निर्णयानुसार आयुक्त सक्षम आहेत किंवा सदर शासन निर्णय महानगरपालिकेस लागू नाही याबाबत स्पष्ट मार्गदर्शन शासनाकडून मागवा.

यावर दिनांक ०६/०९/२०११ रोजी रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेत कायम आस्थापना सुचीवर कार्यरत असलेल्या खालील कर्मचा-यांनी त्यांचे रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्च परतावा मंजुरी करीता सादर केलेली आहेत.

| अ.नं. | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | मागणी केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री.महेशकुमार उत्तमराव डोईफोडे | उपायुक्त (सा) | १,४४,६७७/- |
| २ | श्री.नंदकुमार भास्करराव मगर | प्र.शहर अभियंता | २,११,३२३/- |
| ३ | श्री.सुरेश कोंडीबा इथापे | ड्राप्समन | २,१५,१२५/- |
| ४ | श्री.अशोक गोविंददास इंदापुरकर | रेकॉर्ड किपर | ६३,७७३/- |
| ५ | श्री.धनंजय बाळू खताडे | शिपाई | ३,०१,४८६/- |
| ६ | श्री.धनंजय बाळू खताडे | शिपाई | १,४९,३५३=६२ |
| ७ | श्रीमती.पद्मावती आनंदराव चांदणे | सफाई कामगार | ८३,४८६/- |
| ८ | श्री.सय्यद अहमद हाजीमियॉ | बिगारी | १,४४,४५३/- |
| ९ | श्री.तान्हाजी मालु भांड | बिगारी | १,५१,८११=७२ |
| १० | श्री.पोपट यमाजी प्रभुणे | बिगारी | २,११,३३८=८३ |
| ११ | श्री.नारायण पंढरीनाथ जोशी | बिगारी | ५४,८०२=५० |
| १२ | श्री.नारायण पंढरीनाथ जोशी | बिगारी | ७२,१४२/- |
| १३ | श्रीमती.शांता अर्जुन कुचेकर | बिगारी | ८२,३२६/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | श्री.दत्तात्रय गेणू कोतकर | बिगारी | १,०६,६९६=६२ |
| १५ | श्री.अशोक बबन कोतकर | शिपाई | १,११,५९९=६९ |
| १६ | श्री.तुकाराम आबाजी कोतकर | शिपाई | १,८३,९३०/- |
| १७ | श्री.बाबा काळु भाकरे | झाडू कामगार | ९१,८९३=७३ |
| १८ | श्री.विठ्ठल दादाभाउ सातपुते | बिगारी | १,४३,४५४/- |
| १९ | श्री.बाबासाहेब सिताराम दातरंगे | बिगारी | १,७०,८०४=९२ |
| २० | श्री.एकनाथ रामचंद्र काळे | ड्रायव्हर | १,७२,९३५/- |
| २१ | श्री.गोरख मनाजी ठुबे | बिगारी | १,०९,९१७/- |
| २२ | श्री.सुनिल लहानु शेकटकर | वरिष्ठ लिपीक | ७३,०७७/- |
| | | एकुण | **३०,५०,४०५=६३** |

मा.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/ प्र.क्र.१, आरोग्य-३ मंत्रालय, मुंबई दिनांक १९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील अंतरुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करणेस मा.महासभा ठराव क्र. २ दिनांक ३-११-२००७ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी देण्यांत आलेली आहे. त्यानुसार जा.क्र.आस्थापना ३५१ दिनांक २९-०४-२००८ अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांत आलेली आहे.

मा.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे दिनांक १९ मार्च २००५ मधील आदेशानुसार मुद्दा क्र.३ मधील २ नुसार रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमीत करण्यांत आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचीत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यांत आलेली असल्याने महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या वैद्यकीय खर्च परतावा देयके (रु.४०,०००/- चे वरील) जा.क्र. आस्थापना २९१३ दिनांक ६-११-२००८, जा.क्र.आस्थापना ४६३६ दिनांक १६-३-२००९, जा.क्र.आस्थापना २४ दिनांक २-४-२००९, जा.क्र.आस्थापना ४६६७,४६७३,४६७२ दिनांक १९-३-२००९ अन्वये मा.कक्ष अधिकारी यांचेकडे पाठविण्यांत आलेले होते.

वरील पत्राच्या अनुषंगाने मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांनी दिनांक २७ जुलै २००९ अन्वये सदर प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका हे निर्णय घेण्यास सक्षम असलेबाबत कळविण्यांत आले होते. सदरची वैद्यकीय खर्च परतावा देयके परत पाठविण्यांत आलेली आहेत.

सदर बाबत मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मुंबई यांना जा.क्र.आस्थापना २४०५ दिनांक २९-१०-२००९, जा.क्र.आस्थापना ३६९७ दिनांक २०-२-२०१० व जा.क्र.आस्थापना ११६८ दिनांक९-७-२०१०अन्वये रु.४०,०००/-च्या वरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके मंजूर करणेबाबतचे अधिकार कोणत्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहेत याबाबत शासनाच्या निर्णयाच्या

आदेशाची प्रत मागविण्यात आली होती. परंतु मा.शासनाकडुन अद्यापपर्यंत कोणतेही मार्गदर्शन प्राप्त झाले नसुन शासन निर्णयाची प्रत देखील प्राप्त झालेली नाही.

अहमदनगर महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०११-२०१२ यामध्ये वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती या लेखाशिर्षाखाली रु.२०,००,०००/- ची तरतुद करण्यांत आलेली आहे. आज अखेर रु.४०,०००/- चे आतील ३,५४,५२७/- ची वैद्यकीय परतावा देयके अदा करण्यांत आली असुन १६,४५,४७३/- इतकी तरतुद शिल्लक आहे.

वरील कर्मचा-यांनी सादर केलेली रु.४०,०००/- च्या वरील देयकाची एकुण रक्कम रु.३०,५०,४०५=६३ इतकी असुन मा.शासनाचे आदेशानुसार ९०% प्रमाणे अंदाजे रक्कम रु.२७,४५,३६५/- इतकी आहे.

सदर प्रकरणी रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुर करणे बाबतच्या शासन निर्णयाची प्रत अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नाही. सदर कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुरीकरीता मा.महासभा यांचेकडे निर्णयास्तव सादर करणे बाबत दिनांक २९-८-२०११ रोजी मनपा कामगार युनियन व प्रशासन यांचेमध्ये झालेल्या संयुक्त बैठकीमधील जा.क्र.कामगार १५९८ दिनांक ३-८-२०११ च्या निर्णयानुसार सुचीत केलेले आहे. सदरचे देयकास मा.महासभेची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर वरील कर्मचा-यांनी सादर केलेली देयके तपासणी करुन पात्र असलेली वैद्यकीय खर्च परतावा देयके संबंधितांना अदा करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे कर्मचा-यांनी सादर केलेली वैद्यकीय खर्च परतावा देयके अदा करणे बाबतच्या प्रस्तावास व येणा-या खर्चास मंजुरी देणेकामी निर्णय घेणेकरीता मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा करा

यावर आस्थापना विभाग दिनांक १०/१०/२०११ रोजी सादर रिपोर्ट की,

अहमदनगर महानगरपालिकेतील कायम आस्थापना सुचिवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांचे स्वतःचे व त्यांच्या कुटुंबियांचे रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुरी करीता सादर केलेली आहेत.

मा.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१, आरोग्य-३ मंत्रालय, मुंबई दिनांक १९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील अंतरुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करणेस मा.महासभा ठराव क्र. २ दिनांक ३-११-२००७ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी देण्यांत आलेली आहे. त्यानुसार जा.क्र.आस्थापना ३५१ दिनांक २९-०४-२००८ अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती योजना दि.१/४/२००८ पासुन लागु करण्यांत आलेली आहे.

मा.महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे दिनांक १९ मार्च २००५ मधील आदेशानुसार मुद्दा क्र.३ मधील २ नुसार रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमीत करण्यांत आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या आधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचीत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले असल्याने महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या वैद्यकीय खर्च परतावा देयके (रु.४०,०००/- चे वरील) जा.क्र. आस्थापना २९१३ दिनांक ६-११-२००८, जा.क्र.आस्थापना ४६३६ दिनांक १६-३-२००९, जा.क्र.आस्थापना २४ दिनांक २-४-२००९, जा.क्र.आस्थापना ४६६७,४६७३,४६७२ दिनांक १९-३-२००९ अन्वये मा.कक्ष अधिकारी यांचेकडे पाठविण्यांत आलेले होते.

वरील पत्राच्या अनुषंगाने मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांनी दिनांक २७ जुलै २००९ अन्वये सदर प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका हे निर्णय घेण्यास सक्षम असलेबाबत कळविण्यांत आले होते व सदरची वैद्यकीय खर्च परतावा देयके परत पाठविण्यांत आलेली आहेत.

सदर बाबत मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मुंबई यांना जा.क्र.आस्थापना २४०५ दिनांक २९-१०-२००९, जा.क्र.आस्थापना ३६९७ दिनांक २०-२-२०१० व जा.क्र.आस्थापना ११६८ दिनांक ९-७-२०१० अन्वये रु.४०,०००/- च्या वरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके मंजूर करणे बाबतचे अधिकार कोणत्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहेत याबाबत शासनाच्या निर्णयाच्या आदेशाची प्रत मागविण्यात आली होती. परंतु मा.शासनाकडुन अद्यापपर्यंत कोणतेही मार्गदर्शन प्राप्त झाले नसुन शासन निर्णयाची प्रत देखील प्राप्त झालेली नाही.

अहमदनगर महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०११-२०१२ यामध्ये वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती या लेखाशिर्षाखाली रु.२०,००,०००/- ची तरतुद करण्यांत आलेली आहे. आज अखेर रु.४०,०००/- चे आतील ३,५४,५२७/- ची वैद्यकीय परतावा देयके अदा करण्यांत आली असुन १६,४५,४७३/- इतकी तरतुद शिल्लक आहे.

महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी सादर केलेली रु.४०,०००/- चे वरील देयकांची एकुण रक्कम रु.३०,५०,४०५=६३ इतकी असुन मा.शासनाचे आदेशानुसार ९०% प्रमाणे अंदाजे रक्कम रु.२७,४५,३६५/- इतकी आहे.

सदर प्रकरणी रु.४०,०००/- चे वरील वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुर करणे बाबतच्या शासन निर्णयाची प्रत अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. सदर कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुरी करीता मा.महासभा यांचेकडे निर्णयास्तव सादर करणेबाबत दि.२९/८/२०११ रोजी मनपा कामगार युनीयन व प्रशासन यांचेमध्ये झालेल्या संयुक्त बैठकीमधील पत्र जा.क्र. कामगार १५८९ दि.३/८/११ च्या निर्णयानुसार सुचीत केलेले आहे. सदरचे देयकास मा.महासभेची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी सादर केलेली देयके लेखा परिक्षण विभाग यांचेकडून तपासणी करून पात्र असलेली वैद्यकीय खर्च परतावा देयके संबंधीताना अदा करणे उचित वाटते.

तरी महानगरपालिकेत कायम आस्थापना सुचिवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुर करणेबाबत प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मनपा कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती करणे संदर्भातील शासन निर्णय मनपा महासभा ठराव करुन लागू करण्यात आला आहे. त्यानुसार मा.आयुक्तांना रक्कम रु.४४,००० पर्यंतची मंजूरी देण्याचे अधिकार प्राप्त आहेत परंतु त्यापुढीलही रक्कमे संदर्भातील मा.शासनाकडील मार्गदर्शनानुसार मा.आयुक्त, मनपा हे निर्णय घेण्यास सक्षम आहे. परंतु त्यासंदर्भातील मा.निर्णय / परिपत्रक प्राप्त झालेले नाही. त्यामुळे रक्कम रु.४०,०००/- च्या पुढील वैद्यकीय देयके मा.आयुक्त स्तरावरच मंजूर करावयाची झाल्यास ज्याप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती देणे संदर्भात धोरणात्मक बाब म्हणुन महासभेची मंजुरी घेण्यात आली आहे. त्याप्रमाणेच याबाबतही मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याचे मत आहे. त्यान७सार मान्य असलेस रक्कम रु.४०,०००/- च्या पुढील वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके मा.आयुक्त यांच्या व्दारेच मंजूर करण्याचे अधिकार देणेबाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, १) सदर प्रतिपुर्तीवर साधारणतः वार्षिक किती खर्च होतो. २) mediclaimp policy घेतल्यास कर्मचा-यांना योग्य लाभ मिळू शकणार का, त्यामध्ये पालिकेला वार्षिक किती खर्च येवू शकतो याबाबत काही विमा कंपन्यासोबत चर्चा करुन एकत्रित प्रस्ताव तयार करा व त्यानुसार महासभेपुढे ठेवा.

फेरसादर,

वैद्यकीय प्रतिपुर्तीवर साधारणपणे मागील दोन वर्षात सन २००८-२००९ मध्ये रु.६,४२,७६५/- व सन २००९-२०१० मध्ये रु. ५,५९,१७७/- प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. सन २०१०-२०११ साठी सुधारीत अंदाजपत्रकीय तरतुद रु.१५,७५,०००/- असुन साधारणतः रु.१०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

मेडिक्लेम योजना संदर्भात खालील विविध विमा कंपन्यांशी चर्चा करुन मिळालेल्या माहितीनुसार अहवाल खालील प्रमाणे

**१) इंडिया फर्स्ट कंपनी :-** विमासुरक्षा रक्कम रु.३,००,०००/- प्रती कर्मचारी सरासरी वार्षिक हप्ता (कुटुंबा शिवाय)- १,६३२/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च रु.३८,६९,४७२/-

कर्मचा-यांना मिळणारी सुविधा-नेटवर्क हॉस्पीटल मध्ये आंतररुग्ण कर्मचा-यास कॅशलेस सुविधा.

**२) मॅक्स बुपा हेल्थ इंशुरन्स कंपनी :-**

**योजना क्र.१:-** विमा सुरक्षा रक्कम - वर्ग १ व वर्ग २ मधील

अधिकारी, कर्मचारी साठी रु.१,००,०००/-

वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी साठी रु. ५०,०००/-

प्रती कर्मचारी (कुटुंबा शिवाय) सरासरी वार्षिक हप्ता - २९५१/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च - ६९,९८,६७२/-

कर्मचा-यांना मिळणा-या सुविधा-नेटवर्क हॉस्पीटल मध्ये आंतररुग्ण कर्मचा-यास कॅशलेस सुविधा

**योजना क्र.२ :-** विमा सुरक्षा रक्कम वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकारी,कर्मचारी साठी रु.२,००,०००/-
वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी साठी रु.१,००,०००/-

प्रती कर्मचारी (कुटुंबाशिवाय) सरासरी वार्षिक हप्ता - ३६८४/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च - ८७,३६,४३०/-

कर्मचा-यांना मिळणा-या सुविधा - नेटवर्क हॉस्पीटल मध्ये आंतररुग्ण कर्मचा-यास कॅशलेस सुविधा.

**३) स्टार हेल्थ इंशुरन्स कंपनी :-**

विमा सुरक्षा रक्कम - रु.२,००,०००/-

प्रती कर्मचारी सरासरी वार्षिक हप्ता (कुटुंबासह-पती पत्नी व दोन मुले) - ५६२५/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च - रु.१,३३,३६,८७५/-

कर्मचा-यांना मिळणारी सुविधा - नेटवर्क हॉस्पीटल मध्ये आंतररुग्ण कर्मचा-यांस कॅशलेस सुविधा.

४) इंडस हेल्थ इंशुरन्स कंपनी :-

विमा सुरक्षा रक्कम - अमर्यादीत

प्रती कर्मचारी सरासरी वार्षिक हप्ता (कुटुंबासह - पती पत्नी व दोन मुले व आई वडील) रु.८,०००/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च रु. १,८९,६८,०००/-

कर्मचा-यांना मिळणारी सुविधा - नेटवर्क हॉस्पीटल मध्ये मोफत आरोग्य तपासणी आंतररुग्ण व बाह्यरुग्ण कर्मचा-यास पहिल्या वर्षी ५० अक्के कॅशलेस सुविधा व दुस-या वर्षापासुन १०० टक्के कॅशलेस सुविधा.

५) ओरीएंटल इंशुरन्स कंपनी :-

**योजना क्र.१ -**

विमा सुरक्षा रक्कम रु.१,००,०००/-

प्रती कर्मचारी (कुटुंबासह-पती पत्नी दोन मुले व आई वडील) सरासरी वार्षिक हप्ता ५,०३०/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च - १,१९,२६,१३०/-

कर्मचा-यांना मिळणा-या सुविधा - नेटवर्क हॉस्पीटल मध्ये आंतररुग्ण कर्मचा-यास रु.१०,०००/- कॅशलेस सुविधा व बाकीचा खर्च प्रतीपुर्तीने.

**योजना क्र.२ -**

विमा सुरक्षा रक्कम रु.६,००,०००/-

प्रती कर्मचारी (कुटुंबासह) सरासरी वार्षिक हप्ता १५,६८०/-

मनपाला लागणारा अपेक्षित वार्षिक खर्च - ३,७१,७७,२८०/-

कर्मचा-यांना मिळणा-या सुविधा - नेटवर्क हॉस्पीटल मध्ये आंतररुग्ण कर्मचा-यास रु.५०,०००/- कॅशलेस सुविधा व बाकीचा खर्च प्रतीपुर्तीने.

वैद्यकीय प्रतीपुर्ती योजनेसाठी सन २०११-२०१२ साठी रु.२०,००,०००/- इतकी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यांत आलेली आहे. उपरोक्त कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर मिळालेले सर्व खाजगी वैद्यकीय विमा योजनेचे अंदाजीत वार्षिक दर हे मनपाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त आहेत.

तरी माहिती व आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, कार्यालय प्रमुखांच्या अधिकारात वाढ केल्याच्या शासन निर्णयाचा उल्लेख करुन फेरसादर करा.

यावर दिनांक २०-१-२०१२ रोजी सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, मा. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दिनांक १९ मार्च २००५ नुसार शासकीय कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना आकस्मिक निवडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मंजुर करण्यांत आलेली आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती योजना लागु करणेस मा. महासभा ठराव क्र. २ दिनांक ३-११-२००७ अन्वये मंजुरी देण्यांत आल्याने दिनांक १-४-२००८ पासुन वैद्यकीय खर्च परतावा योजना लागु करण्यांत आलेली आहे.

सदर शासनाची दिनांक १९ मार्च २००५ नुसार रु. ४०,०००/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्च परतावा मंजुर करण्याचा अधिकार संबधीत विभाग प्रमुखांना देण्यांत आलेला होता व त्यापुढील रकमेची वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजुर करण्याचे अधिकार संबधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत.

मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र-२०११/प्र.क्र-३३३/११/राकावि-२, मंत्रालय, मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये दिनांक १९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करुन प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रु. ४०,०००/- वरुन रु. १,००,०००/- पर्यंत वाढविण्यांत आली असुन सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधीत विभाग प्रमुखाच्या विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत. रु. १,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमीत करण्यांत आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचीत निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत.

वरील शासन निर्णयानुसार रु. १,००,०००/- चे खालील वैद्यकीय खर्च परतावा देयके खालील तक्त्यांत दर्शविलेल्या कर्मचा-यांनी सादर केलेली असुन सदरची देयके मा. मुख्य लेखापरिक्षक यांचेकडुन तपासणी करुन मंजुर झालेली देयके संबधितांना अदा करणे आवश्यक आहे.

| अ. नं | कर्मचा-यांचे नांव | देयक |
|---|---|---|
| १ | श्री. अशोक गोंविददास इंदापुरकर, से. नि. रेकॉर्ड किपर | ६३,७७३/- |
| २ | श्रीमती. पदमावती आनंदराव चांदणे, सफाई कामगार | ८३,४८६/- |
| ३ | श्री. नारायण पंढरीनाथ जोशी, बिगारी | ५४,८०२.५०/- |
| ४ | श्री. नारायण पंढरीनाथ जोशी, बिगारी | ७२,१४१/- |
| ५ | श्रीमती शांता अर्जुन कुचेकर, सफाई कामगार | ८२,३२६/- |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. बाबा काळु भाकरे, सफाई कामगार | ९१,८९३.७३/- |
| ७ | श्री. सुनिल लहानु शेकटकर, से. नि. वरिष्ठ लिपिक | ७३,०७७/- |
| तसेच रु. १,००,०००/- चे वरील वैद्यकीय खर्च परताव्याची देयके खालील प्रमाणे | | |
| ८ | श्री. महेशकुमार उत्तमराव डोईफोडे, उपायुक्त (सा) | १,४४,६७७/- |
| ९ | श्री. नंदकुमार भास्करराव मगर, प्र. शहर अभियंता | २,११,३२३/- |
| १० | श्री. सुरेश कोंडीबा इथापे, ड्राप्समन | २,१५,१२५/- |
| ११ | श्री. धनंजय बाळु खताडे, शिपाई | ३,०१,४८६/- |
| १२ | श्री. धनंजय बाळु खताडे, शिपाई | १,४९,३५३.६२/- |
| १३ | श्री. सय्यद अहमद हाजीमियॉ, बिगारी | १,४४,४५३/- |
| १४ | श्री. तान्हाजी मालु भांड, बिगारी | १,५१,८११.७२/- |
| १५ | श्री. पोपट यमाजी प्रभुणे, बिगारी | २,११,३३८.८३/- |
| १६ | श्री. दत्तात्रय गेणु कोतकर, बिगारी | १,०६,६९६.६२/- |
| १७ | श्री. अशोक बबन कोतकर, शिपाई | १,११,५९९.६९/- |
| १८ | श्री. तुकाराम आबाजी कोतकर, शिपाई | १,८३,९३०/- |
| १९ | श्री. विठ्ठल दादाभाऊ सातपुते, बिगारी | १,४३,४५४/- |
| २० | श्री. बाबासाहेब सिताराम दातरंगे, बिगारी | १,७०,८०४.९२/- |
| २१ | श्री. एकनाथ रामचंद्र काळे, ड्रायव्हर | १,७२,९३५/- |
| २२ | श्री. गोरख मनाजी ठुबे, बिगारी | १,०९,९१७/- |

तरी मा. शासनाचे दिनांक १६ नोव्हेबंर २०११ रोजीचे शासन निर्णयानुसार प्रस्तावित अ. नं. १ ते ७ मधील कर्मचा-यांचा रु. १,००,०००/- चे अतील खर्च परतावा देयके लेखा विभागाकडुन तपासणी करुन अदा करणे बाबत तसेच अ. नं. ८ ते २२ मध्ये दर्शविलेल्या कर्मचा-यांची वैद्यकीय खर्च परतावा देयके रु. १,००,०००/- चे वरील असल्याने सदरची देयके मंजुरीकरिता मा. कक्ष अधिकारी, नवि-२४, नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणे बाबत रिपोर्ट आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक व मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मा.महाराष्ट्र शासन सार्व. आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राबावि-२ दि.१६ नोव्हेंबर २०११ चे शासन निर्णयाप्रमाणे शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरी मर्यादेत केलेल्या वाढीप्रमाणे रक्कम रु.१,००,०००/- पर्यंत खर्चाची परतावा देयके अदा करणेस व रक्कम रु.१,००,०००/- वरील खर्चाची परतावा देयके. मंजुरीकरीता मा.कक्ष अधिकारी, नवि-२४, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणेस मान्यतेकरीता आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, आस्थापना विभाग प्रमुख समक्ष चर्चा करा.
समक्ष चर्चा करुन दिनांक १५-२-२०१२ रोजी फ़ेरसादर,

प्रस्तावीत प्रकरणी मा. शासन निर्णय, सार्वजनीक आरोग्य विभाग क्र. एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दिनांक १९ मार्च २००५ नुसार शासकीय कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना आकस्मिक निवडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतररुग्ण उपचाराच्या

वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मंजुर करण्यांत आलेली आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती योजना लागु करणेस मा. महासभा ठराव क्र. २ दिनांक ३-११-२००७ अन्वये मंजुरी देण्यांत आल्याने दिनांक १-४-२००८ पासुन वैद्यकीय खर्च परतावा योजना लागु करण्यांत आलेली आहे. व त्यानुसार रु. ४०,०००/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्च परतावा मंजुर करण्याचा अधिकार संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेला होता व त्यापुढील रक्कमेची वैद्यकिय खर्च परतावा देयके मंजुर करण्याचे अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकिय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे.

तथापी दि. २०-१-२०१२ रोजी दि. १६ नोव्हेबर २०११ चे सादर केलेल्या सुधारीत शासन निर्णयानुसार प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रु. ४०,०००/- वरुन रु. १,००,०००/- पर्यंत वाढविण्यांत आली असुन सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधीत विभाग प्रमुखाच्या विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत. रु. १,००,०००/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमीत करण्यांत आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचीत निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यांत आलेले आहेत.

त्याअनुषंगाने मा. मुख्यलेखापरीक्षक / मुख्यलेखाधिकारी यांनी सदर प्रकरणी शासकिय कर्मचा-यांच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपुर्तीच्या मंजुरी मर्यादेत केलेल्या वाढीप्रमाणे रक्कम रु. १,००,०००/- पर्यंत खर्चाची परतावा देयके अदा करणेस व रक्कम रु. १,००,०००/- वरील खर्चाची परतावा देयके मंजुरीकरीता मा. कक्ष अधिकारी, नवी-२४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडे पाठविणेस मान्यता दिलेली आहे.

परंतु यापुर्वी वेळोवेळी शासनास यापुर्वीच्या शासन निर्णयाप्रमाणे रु. ४०,०००/- चे वरील प्रकरणे शासनास सादर केलेली आहेत. तरी याबाबत रु. ४०,०००/- चे वरील वैद्यकिय खर्चाचे प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्यानुसार वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या आधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचीत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले असल्याने महानगरपालिकेस प्राप्त झालेले वैद्यकिय खर्च परतावा देयके रु. ४०,०००/- चे वरील प्रकरणे मान्य कक्ष अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेली होती. तथापी सदर प्रकरणी मा. शासनाकडून २७ जुलै २००९ अन्वये सदर प्रकरणी आयुक्त महानगरपालिका हे निर्णय घेण्याबाबत सक्षम असले बाबत कळवुन सदरची वैद्यकिय खर्च परतावा देयके महानगरपालिकेस परत पाठविण्यात आलेली आहे. व याबाबत शासनाकडून रु. ४०,०००/- च्या वरील खर्चाबाबत अधिकार कोणत्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहेत याबाबतच्या शासन निर्णयाच्या आदेशाची प्रत मागविण्यात आलेली होती, परंतु शासनाकडून अद्याप पर्यंत कोणतेही मार्गदर्शन अथवा शासन निर्णयाची प्रत प्राप्त झालेली नाही.

तरी उपरोक्त परिस्थीती पाहता प्रस्तुत प्रकरणी

१) मा. शासनाचे दि. १६ नोव्हेंबर २०११ रोजीचे शासन निर्णयानुसार प्रस्तावीत अनुक्रमांक १ ते ७ मधील कर्मचा-यांचे रु. १,००,०००/- च्या आतील खर्चाची देयके मा. मुख्यलेखापरीक्षक / मुख्यलेखाधिकारी यांचे मंजुरीप्रमाणे अदा करणेस आदेशार्थ सादर.

२) रु. १,००,०००/- चे पुढील वैद्यकिय खर्चाची देयके मा.शासन पत्र क्रमांक अमपा २००९ / ७९१/ प्र.क्र.४७/नवि-२४ ,नगरविकास विभाग दिनांक २७ जुलै २००९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे

मा.आयुक्त स्तरावर मंजुर करावयाचे झाल्यास ज्याप्रमाणे वैद्यकिय प्रतिपुर्ती देणे संदर्भात धोरणात्मक बाब म्हणून मा. महासभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेच याबाबत मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक वाटते व मान्य असलेस रक्कम रु.१,००,०००/- च्या पुढील वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके मा.आयुक्त यांचेद्वारे मंजुर करण्याचे अधिकार देण्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ सादर.

३) मेडीक्लेम पॉलीसी संदर्भात विविध विमा कंपन्यांचे प्रतिनिधींशी चर्चा करुन प्राप्त झालेल्या माहितीनुसार निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, put up through cafo/Audit.

यावर मुख्यलेखापरीक्षक / मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे शासन निर्णयानुसार कर्मचा-यांचे रु.१,००,०००/- आतील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके अदा करणेस तसेच प्रस्तावित "ब" प्रमाणे रक्कम रु.१,००,०००/- चे पुढील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके मा.शासन पत्र क्रमांक २००९/७९१/प्र.क्र.४७/नवि-२४ दि.२७ जुलै २००९ प्रमाणे मा.आयुक्त स्तरावर मंजुर करावयाचे झाल्यास धोरणात्मक बाब म्हणुन मा.आयुक्त यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके मंजुर करण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा), मुख्यलेखापरीक्षक/ मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायासह व फेरप्रस्तावासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती रक्कम रु.१ लाख वरील बीले अदा करणे बाबतचे अधिकार मा.आयुक्त सो यांना न देता मा.महासभेच्या मान्यतेने सदरची बीले अदा केली जावीत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** मा.श्री.बाळासाहेब बोराटे यांनी मांडलेली सूचना योग्य आहे. ती मान्य करावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मागील सर्व साधारण सभेमध्ये कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या रक्कमा अदा करणे बाबत विषय होवुनही अद्यापपर्यंत कर्मचा-यांची बीले अदा केलेली नाहीत.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीची रक्कम रु.४०,०००/- वरील बीले अदा करणेचे / मंजूरीचे अधिकार मा.महासभेला ठेवण्यांत यावेत. प्रशासनाकडुन कर्मचा-यांची बीले वेळेवर काढली जात नाहीत. मुख्य कार्यालय वगळता इतर ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना सदर बीलाकरीता मुख्य कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागतात. मा.शासनाकडुन अहमदनगर महानगरपालिकेकडे नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची अधिका-यांची वैद्यकीय प्रतिपुर्तीची बीले मा.शासनाकडे पाठवावीत.

**मा.श्री.दत्ता कावरे :-** कर्मचा-यांचा प्रतिपुर्तीचा विषय मंजूर करावा. १ लाखापर्यंत आयुक्त यांना अधिकार देणेत यावेत व १ लाखाचे पुढील सर्व मा.महासभेकडे मंजूरीकरीता पाठविणेत यावेत.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये मनपा कर्मचा-यांकरीता गणवेश खरेदी या सदरा खाली तरतुद दाखविलेली आहे. त्यावर खर्चही केला जातो. परंतु मनपाचे कर्मचारी महानगरपालिके मार्फत दिलेला गणवेश वापरत नाहीत. मनपाचे कर्मचारी व ठेकेदार नागरीक यांचेतील फरक समजुन येत नाही.

**श्री.अशोक जाधव स्टोअर विभाग :-** महानगरपालिकेतील गणवेशासाठी पात्र असलेल्या १३५० कर्मचा-यांपैकी ४०० कर्मचा-यांचे गणवेश शिलाई करुन संबंधित कर्मचा-यांना वाटप करण्यांत आलेले आहेत. गणवेश मिळाल्याबद्दल सदर कर्मचा-यांच्या आपण स्वाक्ष-या घेतलेल्या आहेत.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** संबंधित कर्मचा-यांना गणवेश दिल्याबाबत स्वाक्ष-यांची नोंदवही दाखविण्यांत यावी.

**मा.सौ.गितांजली काळे उपमहापौर :-** महानगरपालिकेचे कर्मचारी गणवेश वापरत नाहीत. काही कर्मचा-यांचे गणवेश पुर्णपणे फाटलेले असतात. त्यांचेकडे चौकशी केली असता सदर गणवेश शिलाई करणारे कारागीर यांनी गणवेश शिवुन दिलेला नाही. कारण की त्यांचे बील महानगरपालिके मार्फत अद्यापपर्यंत अदा केले गेलेले नाही. संबंधितांचे बील न दिल्याने कर्मचा-यांस गणवेश शिवुन दिले गेलेले नाहीत.

**उपायुक्त महेशकुमार डोईफोडे :-** सर्व कर्मचा-यांनी महानगरपालिके मार्फत पुरविण्यांत आलेले गणवेश वापरणे बाबत सक्ती करणेत येईल. गणवेश नसेल तर दंडाबाबत तरतुद करु.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** नजीकच्या काही काळात पावसाळा सुरु होत असल्याने पावसाच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. मी माझे निवासस्थानाशेजारी असलेल्या ओपन प्लॉट मध्ये कायम स्वरुपी पाणी साठुन रहात आहे. त्यामुळे तेथे निर्माण होणा-या डासांमुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. सदर प्लॉट मधील पाणी कायमस्वरुपी काढणे बाबत व्यवस्था करण्यांत यावी. संबंधित प्लॉट धारकास नोटीस देवुन कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.पैठणकर उप आरोग्याधिकारी :-** सावेडी विभागात आपत्कालीन व्यवस्थापना करीता ३० लोकांची टीम तयार करण्यांत आलेली आहे. सदर कर्मचा-यांकडुन प्लॉट मधील पाणी काढुन घेवू. सदर ठिकाणी कायम स्वरुपी गटर करणेची आवश्यकता आहे.

**उपायुक्त (सा) :-** ओपन प्लॉट मधील पाणी तात्पुरते काढण्याची तातडीने व्यवस्था करण्यांत यावी.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** सदर ठिकाणी कायमस्वरुपी व्यवस्था करणेकरीता किती एम.एम. पाईपची गटर करणे आवश्यक आहे.

**श्री.सातपुते प्र.शहरअभियंता :-** सदर ठिकाणी ६०० एम.एम.पाईप टाकुन गटर करणे आवश्यक आहे. सदर प्लॉट चोहोबाजुंनी उंच असुन प्लॉट खड्यात आहे. त्या ठिकाणावरुन पुर्ण पणे पाणी काढणे अशक्य आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** प्लॉट धारकास नोटीस देण्यांत यावी.

**डॉ.पैठणकर उपआरोग्याधिकारी :-** लवकरात लवकर पाहणी करुन नोटीस देतो.

**मा.सौ,किरण उनवणे सभापती म.बा.व क समिती :-** कचरा साठवणुकी करीता कंटेनर वाटप का केले गेले नाही.

**श्री.पैठणकर उपआरोग्याधिकारी :-** कच-याचे कंटेनर वाहतुकीकरीता आवश्यक असणारे कंटेनर प्लेसर वाहन नसल्यामुळे कंटेनर वाटप केले गेले नाही.

**मा.सौ.किरण उनवणे, सभापती मबाक समिती :-** कंटेनर नसल्यामुळे सदर ठिकाणी कचरा व्यवस्थीत रहात नाही. वा-यामुळे कचरा इतरत्र पसरतो.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** कंटेनर प्लेसर महानगरपालिकेकडे किती आहेत.

**श्री.पैठणकर उपआरोग्याधिकारी :-** दोन कंटेनर प्लेसर आहेत. परंतु नादुरुस्त असल्यामुळे वापरता येत नाहीत. त्यांचे दुरुस्ती बाबत प्रस्ताव दिलेला आहे. अद्यापपर्यंत दुरुस्ती होवुन मिळालेली नाही.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** कंटेनर प्लेसर दुरुस्तीची जबाबदारी कोणाची आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** महानगरपालिकेच्या अंतर्गत विभागातील चूका आहेत कंटेनर प्लेसर बाबत आम्ही एक वर्षापुर्वी यादी दिलेल्या आहेत. तेंव्हापासुन ते आजपर्यंत त्यांची कार्यवाही केली गेलेली नाही.

**डॉ.पैठणकर उपआरोग्याधिकारी :-** आपल्या यादीनुसार वाढीव कंटेनर प्लेसरची मागणी केलेली आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कंटेनर खरेदी कामी झालेल्या विलंबाबाबत मा.महापौरांनी माहिती घ्यावी.

**मा.श्री.सचिन पारखी :-** कंटेनर प्लेसर खरेदी बाबतचा चेक वेळेवर का दिला गेला नाही. याचीही चौकशी करण्यांत यावी.

**मा.श्री.नितीन शेलार :-** उपनगरामध्ये मोकाट कुत्रे वाढलेले आहेत. त्याबाबत बंदोबस्त करण्यांत यावा.

**मा.महापौर साो :-** महानगरपालिका कर्मचा-यांच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीची रक्कम रु. १ लाखा पर्यंतची बीले देण्याबाबत मा.आयुक्त साो यांनी कार्यवाही करावी. व रक्कम रु.१ लाखाच्या पुढील रक्कमेची बीले मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीसाठी ठेवण्यांत यावीत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमधील सभागृहाचे कामकाज ब-याच दिवसापासुन बंद पडलेले आहे. कामाच्या मुदतीनंतरही काम होवू शकलेले नाही. संबंधीत ठेकेदार काम करण्यास तयार नसतील तर त्यांचे झालेल्या कामाचे मुल्यमापन करुन त्यांचे बील अदा करण्यांत यावे. उर्वरीत कामाची रक्कम संबंधितांकडुन भरुन घेण्यांत यावी.

**मा.श्री.सचिन पारखी :-** संबंधीत ठेकेदाराने ॲग्रीमेंट नुसार काम केलेले नाही. कामास उशीर झाल्यामुळे वस्तुंचे बाजारभाव वाढले यास संबंधित ठेकेदार जबाबदार आहे. शिल्लक राहिलेल्या कामाचे महानगरपालिकेकडे पैसे जमा का केले नाहीत. सभागृहाचे काम करणा-या सहकार एजन्सीला नोटीस द्या झालेल्या कामाचे मुल्यमापन करुन त्यांचे बील द्या बाकी उर्वरीत शिल्लक काम महानगरपालिकेने सुरु करा.

**श्री.सातपुते प्र.शहरअभियंता :-** सात दिवसात काम सुरु करु.

**मा.महापौर साो :-** यापुर्वी मला सदरचे काम सात दिवसात सुरु करतो असे सांगितले अद्यापही काम सुरु केलेले नाही. संबंधितांना नोटीस दिलेली आहे का.

**श्री.सातपुते प्र.शहरअभियंता :-** ३ दिवसापुर्वी नोटीस दिलेली आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** सभागृहाच्या नुतनीकरणाच्या कामास दिरंगाई करणा-या ठेकेदारास दंड लावण्यांत यावा.

**मा.श्री.सचिन पारखी :-** सभागृहाचे नुतनीकरणाचे काम एक वर्षात पुर्ण करणे बंधनकारक असतांना अद्यापपर्यंत पुर्ण केलेले नाही. एक वर्षात काम पुर्ण केले नाहीतर उर्वरीत कामाचे पैसे महानगरपालिका फंडात जमा करण्यांत यावेत. अशी अट आहे. त्या अटीचे संबंधीत ठेकेदार यांनी पालन केलेले नाही.

**श्री.सातपुते प्र.शहरअभियंता :-** झालेले काम तपासुन त्यांचे बील काढणे बाबत कार्यवाही करतो.

**उपायुक्त (सा) :-** महानगरपालिका सभागृहाचे नुतनीकरण करणा-या ठेकेदारास यापुर्वी शहर अभियंता यांनी त्यांचे स्तरावर नोटीस दिलेल्या आहेत. त्या नोटीसला सहकार एजन्सी यांनी प्रतिसाद न दिल्याने मा.आयुक्त साो यांचे मंजूरीने नोटीस दिलेली आहे.

**मा.सौ.किरण उनवणे सभापती मबाक समिती :-** मा.महिला व बाल कल्याण समितीचा मा.उपायुक्त (सा) यांचेकडे असलेला कार्यभार काढुन घेवून महिला व बाल कल्याण समितीचे संपुर्ण कामकाज मा.उपायुक्त (कर) यांचे कडे देणे बाबत मी यादी दिलेली आहे. सदर यादी बाबत अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तरी मी दिलेल्या यादीप्रमाणे महिला व बालकल्याण समितीचा संपुर्ण कामकाजाचा कार्यभार मा.उपायुक्त (कर) यांचेकडेस देण्यांत यावा.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पाहता रक्कम रूपये एक लक्ष पर्यत कायम कर्मचा-यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देण्याबाबत मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी. तसेच रक्कम रूपये एक लक्ष च्या पुढील वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देण्याबाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैद्यकिय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे. तसेच असे देखील ठरविण्यात येत की, एक लक्ष रकमेच्या पुढील कर्मचा-यांच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासून मा.आयुक्त यांनी महासभेच्या मंजूरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.ढोणे मालन सुरेश (वहिनी)

अनुमोदक : मा.श्री. कावरे दत्तात्रय हरीभाऊ

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १०** **दिनांक : २६/५/२०१२**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेची राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगांव येथील महिला जिम खाजगी तत्वावर भाडे तत्वावर चालविण्यास देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा.स्थायी समिती सभा क्रं.०१ ठराव क्रमांक ११ दिनांक २७/०४/२०११ अन्वये.

अहमदनगर महानगरपालिकेची राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर येथील महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यास देणे बाबत करावयाचा करारनामा मसुदा, अटी, शर्ती व भाडे निश्चितीस, मा.स्थायी समिती सभा क्रं.१ , ठराव क्रमांक ११ दिनांक २७/०४/२०११ अन्वये, सदर महिला जिम महानगरपालिकेने मुलभूत सुविधा (पाणी व विज) उपलब्ध करुन हिरकणी महिला बचत गटास दरमहा रु.५००/- (पाचशे मात्र) व अनामत रक्कम रु.१००००/- (दहा हजार मात्र) घेवून पाच वर्षाकरीता भाडे तत्वावर चालविण्यास देणे बाबत मंजुरी दिलेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या मार्केट विभागामार्फत मनपाच्या मालमत्ता भाडे तत्वावर देणे बाबत करावयाचे करारनामे, अनामत व दरमहा भाडे वसुली बाबत कार्यवाही होत असल्याने, प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही मार्केट विभागामार्फत होण्यास विनंती आहे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, शहर अभियंता, खाजगी तत्वावर जीम, मंगलकार्यालये इ.चालविणेस देणेबाबतच्या सर्व प्रकरणासह समक्ष चर्चा करा.

यावर कनिष्ठ अभियंता यांचेकडुन फेरसादर की, दिनांक ०९/०६/२०११ रोजी मा.उपायुक्त (सा) यांचेशी दालनात झालेल्या समक्ष चर्चेनुसार या अगोदर मंजुर झालेल्या प्रकरणांचे अटीशर्तीनुसार सदरचा प्रस्ताव सादर करावा असे आदेशित केले. त्यानुसार सोबत जोडले अटी व शती तयार करुन प्रस्ताव मान्यतेस्तव फेरसादर करीत आहे. व करारनामा करुन घेणे, अनामत रक्कम व दरमहा भाडे वसुल करणे इ. पुढील कार्यवाही मार्केट विभागामार्फत होणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, क.अ.यांच्या अहवालान्वये महानगरपालिकेचे रंगारगल्ली मंगलकार्यालयाच्या अटी व शर्तीनुसार सदर प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे. सोबत अटी व शर्ती जोडल्या आहेत तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे सोबतच्या अटी शर्तीप्रमाणे मनपाची राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर येथील जीम खाजगी तत्वावर चालविण्यास देणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, ५०० रु. दरमहा भाडे कोणत्या आधारे ठरविण्यांत आले ?

यावर क्रीडा विभाग प्रमुख यांचेकडुन फेरसादर की,

विनंती फेरसादर की, विषयांकित प्रस्तावावर मा.नगररचनाकार, अ.नगर महानगरपालिका यांनी सदर प्रस्तावाच्या माध्यमातुन नागरिकांना व्यायामाची सुविधा मिळणार आहे. त्यामुळे या सुविधेचे मुल्यांकन नेहमीच्या भांडवली पध्दतीने करणे योग्य होणार नाही.

तसेच जी संस्था अथवा बचतगट ही व्यायामशाळा वापरा व हस्तांतरीत करा किंवा भाडे तत्वावर चालविण्यास घेईल, त्यांना व्यायामशाळेसह साहित्याची देखभाल करणे अभिप्रेत आहे. सदर भागामध्ये चौकशी केली असता, अशा व्यायामशाळेसाठी रक्कम रु.२००/- प्रति महिना, प्रती व्यक्ती इतके शुल्क संबंधित संस्थेस मिळु शकते. अशा लाभार्थिंची संख्या महिला जिम असल्याने सुरुवातीस ३० पेक्षा अधिक असण्याची शक्यता कमी आहे.

तरी सदर व्यायामशाळेचा दुरुस्ती व देखभाल खर्च, लाभार्थिंचा संख्या व मुळातील प्रस्ताव हा सुविधा पुरविणेचा असल्याने, ही वस्तुस्थिती लक्षात घेता संबंधित संस्था अथवा बचत गटाकडुन दरमहा रक्कम रु.२०००/- प्रती महिना व डिपॉझिट रक्कम रु.१००००/- इतके घेणे योग्य राहील. असा अभिप्राय नोंदविला असुन, प्रशासकीय संमतीने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर केला असता, मा.स्थायी समिती सभा क्र.०९ ठराव क्रमांक ५६, दिनांक ३०/०८/२०१० अन्वये, सदरची जिम भाडे तत्वावर चालविण्यास मिळणे बाबत मागणी असल्यास, तसेच यापुर्वी मनपाच्या मालकीच्या जिम अथवा व्यायामशाळा चालविण्यास दिले असले बाबतचे माहितीसह प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी ठेवणेत यावा, असा ठराव संमत करण्यांत आला.

त्यानुसार सदरच्या माहितीसह जिम भाडे तत्वावर देताना करावयाच्या अटी, शर्ती व भाडे निश्‍चिती बाबतचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीने मा.स्थायी समितीपुढे फेरसादर केला असता, मा.स्थायी समिती सभा क्र.१ ठराव क्रमांक ११ दिनांक २७/०४/२०११ अन्वये हिरकणी महिला बचत गटास दरमहा रु. ५००/- (रुपये पाचशे) भाडे व अनामत रक्कम रुपये १०,०००/- (दहा हजार मात्र) घेवुन, सोबतच्या अटी व शर्तीनुसार पाच वर्षाकरीता भाडे तत्वावर चालविण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. माहितीस व आदेशार्थ सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, भाडे व डिपॉझिट संदर्भात मा.स्थायी समितीने ठराव पारीत केला आहे. त्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित " अ " प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो, यांचा अभिप्राय की, कलम ७९ नुसार भाडे ठरविणे असतांना स्थायी समितीस सदर भाडे कमी करण्याचे अधिकार आहेत का ? नुकसान झाल्यास जबाबदार कोण ? पुन्हा स्थायी समितीस पाठविता येईल काय ?

विषयांकित महिला जिम भाडे तत्वावर चालविण्यास देणे बाबतचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार दरमहा रु२,०००/- व डिपॉझीट रक्कम रु १०,०००/- घेवून चालविण्यास देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आला होता.

यावर मा.स्थायी समिती ठराव नंबर ११, दिनांक २७/११/२०१० अन्वये पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला. ठराव अहमदनगर महानगरपालिकेची राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगांव येथील महिला जिम खाजगी तत्वावर महानगरपालिकेच्या मुलभुत सुविधा (पाणी व विज) उपलब्ध करुन

हिरकणी महिला बचत गटास दरमहा रु५००/- भाडे व अनामत रक्कम रु १०,०००/- घेवून महानगरपालिकेच्या शर्ती व अटीसह पाच वर्षाकरीता भाडे तत्वावर चालविण्यास देण्यांत यावी. अशा बाबतचा ठराव पारीत करण्यात आला.

अधिनियमातील कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या विनियोग करणे बाबतची तरतुद करण्यांत आलेली असुन कलम ७९ (ब) अन्वये स्थायी समितीच्या मंजुरी अन्वये महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या जंगम मालमत्तेचे मुल्य पाच हजार रुपयाहुन अधिक नसेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेचा विनियोग भाडयाने देवून करता येईल.

तथापि सदर महिला जिमचे मुल्य पाच हजाराहुन अधिक आहे. यास्तव सदर प्रकरणी प्रशासनाने ठरविलेल्या भाडे मुल्य कमी करुन सदर जिम भाडयाने देणेबाबत मा.स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करणे उचित होणार नाही.

सबब सदर महिला जिम मासिक भाडयाने द्यावयाची झाल्यास अधिनियमातील ७९ (क) नुसार महानगरपालिकेच्या मान्यतेने प्रशासनाने निश्चीत केलेल्या भाडे रु २,०००/- दरमहा व डिपॉझिट रक्कम रु १०,०००/- घेवून सदर महिला जिम जास्तीत जास्त १२ महिन्यांकरीता खाजगी तत्वावर मनपाने निश्चीत केलेल्या अटी व शर्तीनुसार देता येईल. सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे अखेर निर्णयासाठी ठेवणे योग्य होईल. आदेशार्थ सविनय फेरसादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित " अ " प्रमाणे सदरील विषय मान्यतेस्तव मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट व फेरप्रस्ताव मा.आयुक्त सो, उपायुक्त (सा) यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** अहमदनगर महानगरपालिकेचे राणी लक्ष्मीबाई चौक भुषणनगर केडगांव येथील महिला जीम खाजगीकरणाच्या माध्यमातुन निविदा मागवुन चालविण्यास देण्यांत यावे. महिलांसाठी कार्य करणारे महिला बचत गटास व सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्था यांना प्राधान्य देण्यात यावे.

**मा.श्री. बाबासाहेब वाकळे :-** मा. नगरसेवक श्री. दिलीप सातपुते यांनी जी सूचना मांडली ती मंजूर करावी.

**ठराव :-**

कार्यालयीन अहवालानुसार अनामत रक्कम तसेच दरमहा भाडयाची देकार रक्कमेस मान्यता देण्यात येत आहे. खाजगी करणाच्या माध्यमातुन महिलांसाठी कार्य करणा-या महिला बचत गटास व सामाजिक संस्था , स्वंयसेवी संस्थेस सदर जीम चालविणेस देणे या धोरणानुसार व प्रस्तावातील अटी शर्ती अन्वये मा. आयुक्त यांनी निविदा मागविणे बाबत कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते.

अनुमोदक : मा.श्री. बाबासाहेब सोन्याबापू वाकळे.

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**भाडेपट्टा करारनामा मसुदा**

**भाडेपट्टा करार-**

भाडेपट्टा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मिळकती बाबत दर महिन्याचे भाडे रक्कम रू. ................. अक्षरी रूपये .................. मात्र चे आज .......वार दि. / /२०१० ते ................ ची मुदत महिने ११ साठीचा.

**लिहून घेणार-**

अहमदनगर महानगरपालिके तर्फे
मा.आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

**लिहून देणार-**

--------------------------------------
--------------------------------------
--------------------------------------

**कारणे करारनामा लिहून देणार की,**

१. **मिळकतीचे वर्णन-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगाव भुषणनगर येथे अहमदनगर महानगरपालिकेने बांधलेली महिला जिम क्षेत्र ८२.५ m२ अत्याधुनिक व्यायाम साहित्यासह भाडेतत्वावर चालविण्यास दिली आहे.

| **अ.क्र.** | **साहित्य तपशील** | **नग** | **किंमत** |
|---|---|---|---|
| 1 | MULYIHIP 60KG SSW-231 | 1 | 38,879/- |
| 2 | ADUCTOR/ABDUCTOR- 60KG SSW-336 | 1 | 55,354/- |
| 3 | SEATED LEG PRESS SSW-223 | 1 | 43,723/- |
| 4 | ASSISTED CHIN UP/DIPS 80KG SSW-200 | 1 | 39,909/- |
| 5 | LEG CUR / EXTESION 80KG SSW-226 | 1 | 48,403/- |
| 6 | BUTTER RLY / PEG OEC 80KG SSW-226 | 1 | 41,522/- |
| 7 | ABDOMEN CRUNCH 60KG SSW-232 | 1 | 42,988/- |
| 8 | GLUTES MACHINE 80KG SSW-235 | 1 | 42,110/- |
| 9 | HYPER EXTENSION FW-303 | 1 | 12,325/- |
| 10 | ABDOMEN CRUNCH BENCH FW-302 | 1 | 19,958/- |
| 11 | ELECTRONIC TREADMILL HCA- 502 | 1 | 1,55,200/- |
| 12 | BELT MASSAGER HCA-502 | 1 | 24,504/- |
| 13 | MASSAGER HCA-503 | 1 | 29,494/- |
| 14 | EXCER CYCLE HCA-504 | 1 | 7,275/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | STEP CLIMBER HCA-509 | 1 | 29,197/- |
| 16 | AERO RIDER HCA-510 | 1 | 10,990/- |
| 17 | DUMBELL RACK FA-402 | 1 | 14,065/- |
| 18 | TWISTER SINGLE AND SEATED HCA-507 | 1 | 18,048/- |
| 19 | M.S. DUMMELS WTU-606 42KG. | 42kg | 6,518/- |
| | | 4% Tax | 27,218/- |
| | | Total Rs. | 7,07,680/- |

येणे प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेने बांधलेली महिला जिम वरील अत्याधुनिक व्यायाम साहित्यासह जागाभाडे दरमहा रू..................अनामत रक्कम रू..................अधिक सेवाकर व महानगरपालिकेने वेळोवेळी केलेली भाडेवाढ मान्य राहिल. सदरील मिळकतीवर नियमानुसार होणारा मालमत्ताकर लिहून देणार यांनी भरावयाचा आहे.

२. सदर जिमचे दरमहा आगाउ भाडे दरमहा १० तारखेच्या आत देत जाउन त्याची लिखीत पावती घेत जाईन. विना पावती भाडे पोहोच झालेची तोंडी सबब सांगणार नाही. तसेच भाडे वेळेत न दिल्यास भाडे रकमेवर दरमहा १० टक्के व्याज देण्याची जबाबदारी राहिल. यातुनही दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे देणेचे राहिल्यास त्वरीत सदर जागा तुमचे कब्जात देईन किंवा मनपास त्याचा तत्काळ कब्जा घेण्याचा हक्क राहिल.

३. मुदती अखेर म्हणजेच करारनामा केल्याचे तारखेनंतर बरोबर ११ महिन्यांनी जिमचा कब्जा मनपास देईन. जर कब्जा मुदतीत मनपास सदर जागेची जरूरी भासलेस नुकसान भरपाई न मागता अथवा अन्य कोणेतीही सबब न सांगता मुदतीपूर्वी सदरची जिम खाली करून मनपाच्या कब्जात देईन. त्यास मी कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार करणार नाही.

४. सदर करारनाम्याची मुदत वाढवुन देण्याचे अधिकार मा.आयुक्त अ.नगर मनपा यांचेकडे राहतील.

५. सदर जिमध्ये मनपाच्या लेखी परवानगी शिवाय बांधकाम अथवा दुरूस्तीमध्ये फेरबदल करता येणार नाही.

६. ताब्यात घेतलेले व्यायाम साहित्य करारनामा कालावधी संपल्यानंतर जसेच्या तसे ताब्यात द्यावे लागेल. अन्यथा साहित्याबाबत झालेली दुरूस्ती अथवा नविन खर्च आपले डिपॉझीट मधुन वसुल करण्यात येईल व त्याशिवयाय जादा नुकसान झाल्यास मी भरण्यांस तयार आहे.

७. सदर जिम ही खास महिलांकरिता असल्यामुळे जिम मध्ये जिम सुरू होणे आगोदर प्रशिक्षित महिला प्रशिक्षक उपलब्ध करून द्यावी लागेल.

८. जिम सुरू व बंद करण्याचे वेळेचे सर्व अधिकार मा.आयुक्त,अ.नगर मनपा यांचेकडे राहतील.

९. जिम चालविण्यास घेणारा महिला बचत गट अथवा संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक असुन, त्यांनी कमीत कमी १ वर्षाचे बॅक स्टेटमेंट द्यावे लागेल.

१०. जिमचे लाईट बिल भरण्याची व इतर देखभाल विशेषतहा जिम मध्ये व्यायामासाठी येणा-या महिलांची संरक्षणाची जबाबदारी सर्वस्वी चालकावरच राहिल.

११. जिम व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे, तसेच जिममधील खुल्या जागेत १० झाडे लावुन त्यांचे संगोपन करणे चालकावर बंधनकारक राहिल.

१२. जिममध्ये व्यायाम करताना एखाद्या महिला खेळाडुस दुखापत अथवा नैसर्गिक आपत्ती झाल्यास, व त्या अनुशंगाने कोणतीही कोर्ट कार्यवाही झाल्यांस त्याची सर्व जबाबदारी चालकावर राहिल.

१३. सदर जिम चालकधारकाने मनपाच्या अटी व शर्तीनुसार रू.१००/- चे स्टॅप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

१४. वेळोवेळी करारनामा अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, अ.नगर महानगरपालिका यांचेकडेस राहतील.

१५. सदरचा करारनामा मी करून देत असुन जर माझ्याकडून कराराचे उल्लंघन अथवा मनपास आर्थिक नुकसान झाल्यास सदर अर्थिक नुकसानीस माझे इस्टेट, वारस वहिवाटदार, मृत्युपत्र चालविणारे यांचेवर लागु व बंधनकारक असुन, सदर नुकसान त्यांचे स्थावर जंगम मालमत्तेतुन वसुल करावा. त्यास त्याची हरकत राहणार नाही. तरी लिहुन दिलेला करार मी अक्कल हुशारीने, स्वसंतोषाने विना दडपण आज मुक्कामी अहमदनगर येथे लिहुन दिला आहे.

साक्षीदार :- १ सही :- १

२. २.